




दैनिक
# राष्ट्रसह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक २७ । शुक्रवार ६ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com



आदित्य रिन्यूएबल एनर्जी (सोलर प्रोजेक्ट)
पी.एम. सुर्यघर योजना
रू.७८,०००/-
अनुदान,
शासकिय बँकेचे
५.७५%
दराने कर्ज
तात्काळ जागेवरच
मंजूर
२००५
पासून ग्राहकसेवेत

प्रकाश घुगे : ९४२३७८५९६५ ऑफिस : ९८५०७१६४०६
श्रीरामपूर : नगरपालिका हॉस्पिटल समोर, श्रीरामपूर




## महत्त्वाचे..

### एसटीच्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १० हजारांचे सानुग्रह अनुदान

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सर्व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२ हजार ५०० रुपये सण उचल, तसेच महागाई भत्ता ५८ वरून ६० टक्के करण्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी (५ नोव्हेंबर) केली.

एसटी कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. महामंडळ आर्थिक अडचणीत असले तरी कर्मचाऱ्यांच्या दिवाळीचा आनंद हिरावून घेणार नाही, अशी भूमिका सरनाईक यांनी मांडली. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी कर्मचारी अहोरात्र मेहनत घेऊन लाखो प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची सेवा देतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून हा निर्णय घेतल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# खरिपाच्या नुकसानीपोटी १,३६५ कोटींची मागणी!

## अहिल्यानगर जिल्ह्यात १२ लाख १५ हजार शेतकऱ्यांना दुष्काळाचा फटका

### ५.५६ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर पाच हजारांची मदत जमा; उर्वरित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतीसाठी प्रशासनाचे प्रयत्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** यंदा पावसाने दडी मारल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील खरिपाचा हंगाम संकटात सापडला आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान सरासरीच्या तुलनेत ३४ टक्के कमी पाऊस झाल्याने १४ तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील १ हजार ६१० गावांमधील १२ लाख १५ हजार शेतकऱ्यांच्या ९ लाख ६२ हजार ११६ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी राज्य शासनाकडे १ हजार ३६५ कोटी १४ लाख रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने सादर केला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी गुरुवारी माध्यम संवाद कार्यक्रमात ही माहिती दिली.

जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत ४४८.१० मिलिमीटर पाऊस अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ २९७.९० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. नुकसान झालेल्या क्षेत्रात ३ लाख ५४ हजार १८५ हेक्टर जिरायती, ५ लाख ८२ हजार ४३३ हेक्टर बागायती आणि ५५ हजार ४९६ हेक्टर फळपिकांचा समावेश आहे. शासनाच्या निकषांनुसार पंचनामे पूर्ण करून मदतीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

दरम्यान, पीकविम्याच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील ४ लाख ९५ हजार ८०६ शेतकऱ्यांनी २ लाख ११ हजार ९६५ हेक्टर क्षेत्रासाठी विमा संरक्षण घेतले असून, सुमारे १ हजार ४७१ कोटी रुपयांची संरक्षित रक्कम मिळण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. सोयाबीनचे पीक कापणी प्रयोग पूर्ण झाले असून बाजरीचे ९८ टक्के, तर मक्याचे ८४ टक्के प्रयोग पूर्ण झाले आहेत.

### ९.६२ लाख हेक्टरवरील पिकांचे पंचनामे पूर्ण

#### ५.५६ लाख शेतकऱ्यांना पाच हजारांची मदत

**राज्य सरकारने दिवाळीपूर्वी जाहीर केलेल्या पाच हजार रुपयांच्या मदतीसाठी जिल्ह्यातील ११ लाख ७८ हजार ५५५ शेतकरी पात्र ठरले आहेत. त्यापैकी ५ लाख ५६ हजार २२५ शेतकऱ्यांच्या खात्यांवर २७८ कोटी ११ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांनाही दिवाळीपूर्वी मदत देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.**

#### चारा टंचाईवर ज्वारीचा पर्याय

**पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासाठी रब्बी ज्वारीचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना २१ हजार २० बियाणे संच मोफत वाटप करण्यात येत असून, प्रत्येक संचात चार किलो ज्वारीचे बियाणे आहे. त्यातून २१ हजार एकर क्षेत्रावर चारा पिकाची लागवड अपेक्षित आहे.**




# न्यायासाठी गर्भवती महिलेची लेकरांसह मंत्रालयाकडे पायपीट!

**शेजाऱ्यांकडून छळ; वारंवार तक्रारी करूनही न्याय मिळत नसल्याने निर्णय**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** पोटात बाळ, सोबत दोन अल्पवयीन मुले आणि हाताला धरून चालणारा पती... डोक्यावर उन्हाचा ताप, पायात प्रवासाचा थकवा; पण मनात एकच आशा, ती म्हणजे न्याय मिळण्याची! शेजाऱ्यांकडून होणारा छळ, मारहाण आणि जीवे मारण्याच्या धमक्यांना कंटाळून पेडगाव येथील पूजा महादेव गावडे या गर्भवती महिलेने आपल्या कुटुंबासह थेट मंत्रालय गाठण्याचा निर्णय घेतला आहे. २ नोव्हेंबरपासून अहिल्यानगर ते मुंबई असा पायी प्रवास सुरू करून त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

पूजा गावडे यांच्या म्हणण्यानुसार, २०१५ पासून शेजारी गोरख मोहन खेडकर आणि मच्छिंद्र मोहन खेडकर यांच्याकडून त्यांना त्रास दिला जात आहे. शासनाच्या दीनदयाळ योजनेतून जागा आणि प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुल मिळाले; मात्र या घराला दरवाजा व चौकट बसविण्यासही विरोध केला जात असल्याचा त्यांचा आरोप आहे. घरासमोर कचरा, खरकटे अन्न टाकणे, ट्रॅक्टर उभा करणे आणि सरपण टाकून अडथळे निर्माण करणे असे प्रकार होत असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

ग्रामपंचायतीकडे तक्रार केल्याचा राग धरून घरात घुसून लाकडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. या घटनेत पती **(पान ४ वर)**

# ४८८ कामगारांच्या संघर्षाला यश; आता जबाबदारीही वाढली !

## श्रद्धा आणि सबुरीने मिळवलेले यश टिकवून ठेवा; पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कामगारांना आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** श्रद्धा आणि सबुरीच्या बळावर कामगारांनी केलेल्या वीस वर्षांच्या संघर्षाला अखेर यश मिळाले आहे. सर्वांनी एकजुटीने आणि विश्वासाने लढा दिल्यामुळे आनंदाचा क्षण अनुभवता येत आहे. या यशात अनेकांचे योगदान असले, तरी आता वाढलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून काम करा, असे आवाहन जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




शिर्डी संस्थानमधील ४८८ कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला. या निर्णयासाठी मंत्रालय स्तरावर विखे पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्दल कामगार संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, नगराध्यक्षा जयश्री थोरात, अतिरिक्त जिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपनगराध्यक्ष अभय शेळके, कामगार पतसंस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पवार आदी उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, कामगारांचा हा वीस वर्षांचा संघर्ष होता. सर्व कामगार एकजुटीने उभे राहिले, हीच या यशाची मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे हा निर्णय शक्य झाला. अनेकांनी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला; मात्र कामगारांनी श्रद्धा आणि सबुरीचा मार्ग सोडला नाही. यापूर्वी १ हजार ५२ कामगारांच्या सेवाकायमीचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात झाला होता. त्यासाठी स्व. जयंतराव ससाणे यांच्यासह आपण पाठपुरावा केला होता, असेही त्यांनी सांगितले.

शिर्डीसाठी कोणताही निर्णय घेताना स्वार्थाचा विचार केला नाही. सामाजिक बांधिलकी जपत दिलेल्या शब्दाची पूर्तता करण्याची भूमिका कायम ठेवली. आता कामगारांची जबाबदारी वाढली असून, शिर्डीत येणाऱ्या भाविकांचे स्वागत, सुरक्षा आणि स्वच्छता यांना प्राधान्य द्यावे. भाविकांना चांगला अनुभव मिळाल्यास शिर्डीचा लौकिक अधिक वाढेल, असेही विखे पाटील यांनी स्पष्ट केले. डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, अनेक वर्षांपासून होत असलेल्या आरोपांना आणि टीकेला या निर्णयामुळे पूर्णविराम मिळाला आहे. आजचा दिवस शब्दपूर्तीचा असून, विखे पाटील यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या कामगारांना त्याचे फळ मिळाले आहे. यावेळी गोरक्ष गाडीलकर आणि विठ्ठलराव पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

# कपाशीच्या शेतात गांजाची लागवड

## गुरव पिंपरी शिवारात ३२ लाखांचा गांजा जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील गुरवपिंप्री (गावडेवाडी) शिवारात शेतात गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आणला असून मिरजगाव पोलिसांनी छापा टाकून तब्बल ६३ किलो ६५५ ग्रॅम गांजा अंदाजे ३१ लाख ८२ हजार रुपये ७५० रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे.

याप्रकरणी एका आरोपीला मिरजगाव पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

याबाबत मिरजगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, गुरवपिंप्री, ता. कर्जत याठिकाणी एका व्यक्तीने त्याचे कपाशीच्या शेतात गांजाची लागवड केली आहे. सदर बातमीची पोलिसांनी खात्री करुन ईसम नामे तात्याराम भिकाजी गावडे, रा. गावडेवाडी, गुरवपिंप्री, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर याचे राहते घराचे शेजारील कपाशीचे शेतामध्ये मिरजगाव पोलीस स्टेशन व उपविभागीय कार्यालय कर्जत यांच्याकडून दि.४ नोव्हेंबर रोजी संयुक्त छापा टाकत कारवाई करुन एकुण ६३ किलो ६५५ ग्रॅम वजनाचा तब्बल ३१ लाख ८२ हजार ७५० रुपये किंमतीचा गांजा (अंमली पदार्थ) जप्त करण्यात आला असून आरोपी तात्याराम भिकाजी गावडे, रा.गावडेवाडी, गुरवपिंप्री, ता. कर्जत यास अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी आरोपीविरुध्द मिरजगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **(पान ४ वर)**



## अभय योजना : थकबाकीदार वीज ग्राहकांना व्याज, विलंब आकार माफ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** वीजबिलांच्या थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या बिगरशेती ग्राहकांना महावितरणने मोठा दिलासा दिला आहे. महावितरणतर्फे 'अभय योजना २०२६-२७' जाहीर करण्यात आली असून, थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ केला जाणार आहे. तसेच मूळ थकबाकी एकरकमी भरणाऱ्या ग्राहकांना २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. ६ नोव्हेंबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत ही योजना लागू राहणार आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेले घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहक यासाठी पात्र असतील. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेल्यांनाही लाभ घेता येईल. योजनेतून कृषी ग्राहक आणि सार्वजनिक नळपाणीपुरवठा योजना वगळण्यात आल्या आहेत. थकबाकी भरून पुन्हा वीजजोडणी मिळविण्याची संधीही ग्राहकांना उपलब्ध होणार आहे.

## सरकार नियुक्त संचालक आले तरी गोकुळ सतेज पाटलांच्याच ताब्यात?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हापूर :** जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या सत्तास्थापनेचा पेच अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. सरकारने तज्ज्ञ आणि शासकीय स्वीकृत संचालकांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी अध्यादेश काढल्यास तो कायद्याच्या चौकटीत टिकणार नाही, असा कायदेशीर अभिप्राय भारताचे माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी दिला आहे. त्यामुळे सरकारच्या संभाव्य हस्तक्षेपानंतरही गोकुळची सत्ता सतेज पाटील यांच्या गटाकडेच राहणार का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

गोकुळच्या १३ विरोधी निर्वाचित संचालकांच्या वतीने ॲड. श्रीकृष्ण गणबावले यांनी गवई यांच्याकडून कायदेशीर अभिप्राय मागविला होता. ३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या अभिप्रायात सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७३ अअअ आणि २७(९) नुसार स्वीकृत व शासकीय नामनिर्देशित संचालकांना अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. बहुमताचा कौल बदलण्यासाठी अध्यादेश काढणे हे मनमानी व लोकशाहीविरोधी ठरेल, असेही मत नोंदविण्यात आले आहे.

### माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांचा कायदेशीर अभिप्राय

दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने १० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अध्यक्ष निवडीसाठी २५ निर्वाचित संचालकांना सात दिवसांची नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाचा आदेश प्रलंबित असताना अध्यादेश काढल्यास न्यायालयीन प्रक्रियेत हस्तक्षेप ठरू शकतो, असे गवई यांनी म्हटले आहे. त्यामुळे सरकारच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान मिळाल्यास मोठा कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

# पाणीटंचाईने रब्बीचा हंगाम संकटात; राज्यात अवघ्या १२ टक्के पेरण्या!

## गहू, उसाकडे शेतकऱ्यांची पाठ; ज्वारी, मका, हरभऱ्याला पसंती । जनावरांच्या चाऱ्याची चिंता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** पावसाने यंदा सरासरी गाठली असली, तरी पाणीटंचाईचे सावट रब्बी हंगामावर गडद झाले आहे. धरणांतील अपुरा पाणीसाठा, खालावलेली भूजल पातळी आणि सिंचनासाठी आवर्तने सोडण्याबाबतची अनिश्चितता यामुळे राज्यातील रब्बी पेरण्यांचा वेग मंदावला आहे. ३ नोव्हेंबरपर्यंत राज्यात सरासरी क्षेत्राच्या अवघ्या १२ टक्के म्हणजे ६ लाख ७६ हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. पाण्याच्या उपलब्धतेचा अंदाज घेऊन शेतकरी पेरण्यांचे नियोजन करीत आहेत.

राज्यात उसाचे क्षेत्र वगळता रब्बीचे सरासरी पेरणी क्षेत्र ५७.८० लाख हेक्टर आहे. यंदा सर्वाधिक १८ टक्के क्षेत्रावर ज्वारीची पेरणी झाली असून, मक्याची पेरणी १९ टक्क्यांवर पोहोचली आहे. हरभऱ्याची पेरणी ११ टक्के झाली आहे. तुलनेत गव्हाची पेरणी अवघी तीन टक्क्यांवर आहे. पाण्याची कमतरता लक्षात घेता अधिक पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे.

विशेष म्हणजे, ज्वारी आणि मक्याचे पीक धान्य उत्पादनात अपयशी ठरले तरी जनावरांसाठी चारा उपलब्ध होईल, या अपेक्षेने शेतकरी लागवड करीत आहेत. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात उत्पादनापेक्षा चारा सुरक्षेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पाणीटंचाईमुळे सरासरी पेरणी क्षेत्र गाठणेही कठीण होण्याची शक्यता असून, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी चारा पिकांच्या लागवडीचे आवाहन केले आहे.

रब्बीच्या सुरुवातीलाच पेरण्यांनी गाठलेला तळ आगामी काळातील धान्य उत्पादन आणि पशुधनाच्या चारा उपलब्धतेबाबत चिंतेची घंटा ठरू लागला आहे.

### चारा पिकांना प्राधान्य द्या : कृषिमंत्री भरणे

**यंदा पाणी टंचाई असल्यामुळे रब्बी हंगामात सरासरी इतक्या क्षेत्रावर पेरणी होण्याची शक्यता नाही. पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी शेतकऱ्यांनी यंदा चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन द्यावे. चारा बियाणांसाठी कृषी विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.**



# दिवाळीचे अर्थशास्त्र : एका घरातील खर्च, अनेकांच्या घरातील प्रकाश!

कुंभाराच्या पणतीपासून महिला बचतगटाच्या फराळापर्यंत... सणाच्या आनंदामागे असते हजारो हातांची मेहनत; स्थानिक खरेदीतूनच खऱ्या अर्थाने अर्थचक्राला गती..!

दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश केवळ श्रीमंतांच्या घरात उजळत नाही, तर त्या दिव्यांसाठी माती मळणाऱ्या कुंभाराच्या झोपडीपर्यंतही पोहोचतो. कारण अर्थव्यवस्थेचा खरा प्रकाश एखाद्या व्यक्तीच्या संपत्तीत नसतो, तर अनेकांच्या हाताला मिळणाऱ्या कामात आणि त्यांच्या घरात पोहोचणाऱ्या उत्पन्नात असतो. दिवाळी हा केवळ धार्मिक, सांस्कृतिक आणि आनंदाचा सण नाही, तर भारतीय अर्थव्यवस्थेला गती देणारा महत्त्वाचा आर्थिक उत्सवही आहे. या सणाच्या निमित्ताने होणारी खरेदी, विक्री, उत्पादन, रोजगार आणि पैशांची उलाढाल हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाशी जोडलेली असते.

दिवाळी आली की घराघरांत स्वच्छता, रंगरंगोटी, नवीन कपड्यांची खरेदी, फराळाची तयारी आणि सजावटीची लगबग सुरू होते. बाजारपेठा गर्दीने फुलतात. मात्र, ग्राहकांच्या खरेदीच्या पलीकडे एक मोठे आर्थिक चक्र कार्यरत असते. आपण मातीच्या पणत्या घेतो, तेव्हा कुंभाराच्या हाताला काम मिळते. घर रंगवतो, तेव्हा रंगारी आणि मजुरांच्या घरात पैसा जातो. झाडू खरेदी करतो, तेव्हा तो तयार करणाऱ्या कारागिराला उत्पन्न मिळते. कपडे घेताना विणकर, शिंपी, व्यापारी आणि वाहतूकदारांच्या व्यवसायाला चालना मिळते. म्हणजेच एका व्यक्तीचा खर्च दुसऱ्या व्यक्तीच्या उत्पन्नाचा स्रोत बनतो.

**खर्चातून उत्पन्नाचे अर्थचक्र**

अर्थशास्त्रात उत्पादन, उपभोग, विनिमय, वितरण आणि उत्पन्न या संकल्पनांना महत्त्व आहे. दिवाळीत या सर्व प्रक्रिया एकाच वेळी वेगाने घडतात. बाजारात मागणी वाढली की उत्पादकांना अधिक माल तयार करावा लागतो. उत्पादन वाढले की कामगारांची गरज निर्माण होते. कामगारांच्या हातात मजुरी येते आणि तेही आपल्या गरजांसाठी बाजारात खर्च करतात. अशा प्रकारे पैसा एका हातातून दुसऱ्या हातात जात राहतो. अर्थशास्त्रात याला उत्पन्नाचा चक्रीय प्रवाह म्हणतात. दिवाळीच्या बाजारपेठेत मोठ्या उद्योगांबरोबरच लहान व्यावसायिकांचेही योगदान महत्त्वाचे असते. विशेषतः ग्रामीण भागातील कुंभार, सुतार, लोहार, फुलविक्रेते, हातगाडीवाले आणि घरगुती उद्योग चालविणाऱ्या महिलांसाठी हा सण उत्पन्नाची संधी घेऊन येतो.

**पणतीच्या प्रकाशात कुंभाराचे अर्थकारण**

दिवाळी आणि कुंभार यांचे नाते पिढ्यान्पिढ्यांचे आहे. माती गोळा करणे, ती मळणे, पणत्या घडविणे, वाळविणे, भाजणे आणि बाजारात विक्रीसाठी आणणे या प्रत्येक टप्प्यावर कुंभाराचे श्रम आणि कौशल्य गुंतलेले असते. ग्राहकासाठी पणती ही काही रुपयांची वस्तू असते; मात्र कुंभारासाठी ती कुटुंबाच्या उत्पन्नाचे साधन असते. आज विद्युत रोषणाई आणि कृत्रिम सजावटीच्या वस्तूंचे आकर्षण वाढले असले, तरी मातीच्या पणत्यांना प्राधान्य दिल्यास पारंपरिक व्यवसायाला आधार मिळू शकतो. ही खरेदी केवळ परंपरा जपणारी नसून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ देणारी ठरते.

**शेतकरी, कामगार आणि महिला बचतगटांचे योगदान**

दिवाळीच्या काळात फुले, फळे, मिठाई, धान्य, सजावटीच्या वस्तू आणि फराळाला मागणी असते. या मागणीचा लाभ शेतकरी, फुलविक्रेते, किरकोळ व्यापारी आणि वाहतूकदारांना




मिळण्याची संधी असते. त्याचप्रमाणे महिला बचतगट आणि गृहउद्योगांसाठीही दिवाळी महत्त्वाची असते. चकल्या, करंज्या, लाडू, चिवडा यांसारखे फराळाचे पदार्थ तयार करून विकणाऱ्या महिलांना अतिरिक्त उत्पन्न मिळते. आकाशकंदील, कागदी सजावट आणि भेटवस्तू तयार करणाऱ्या कारागिरांनाही बाजारपेठ उपलब्ध होते. अशा छोट्या व्यवहारांतून महिलांचा आर्थिक सहभाग वाढतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला हातभार लागतो. दिवाळीपूर्वी घरांची रंगरंगोटी, दुरुस्ती आणि सजावट केली जाते. त्यामुळे रंगारी, गवंडी, सुतार, इलेक्ट्रिशियन, प्लंबर आणि स्वच्छतेची कामे करणाऱ्या कामगारांना रोजगार मिळतो. मोठ्या उद्योगांपासून ते छोट्या दुकानदारांपर्यंत आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांपर्यंत या आर्थिक उलाढालीचे वेगवेगळे परिणाम पोहोचतात. अर्थात, वाढलेली विक्री म्हणजे प्रत्येकाला समान नफा मिळतो असे नाही. उत्पादन खर्च, बाजारातील स्पर्धा आणि मजुरी यांचाही विचार आवश्यक आहे.

**श्रीमंत आणि गरीब : परस्परावलंबनाचे वास्तव**

समाजातील आर्थिक विषमता ही वस्तुस्थिती आहे. मात्र, श्रीमंत आणि गरीब हे एकमेकांपासून पूर्णपणे स्वतंत्र नाहीत. श्रीमंत व्यक्तीच्या घरातील सुविधा अनेक कामगारांच्या श्रमांवर उभ्या असतात. घर बांधण्यासाठी गवंडी, सजावटीसाठी कारागीर, स्वच्छतेसाठी कामगार आणि अन्नासाठी शेतकरी आवश्यक असतो. दुसरीकडे, या कामगारांना रोजगार मिळण्यासाठी ग्राहकांची मागणी महत्त्वाची असते. म्हणजेच अर्थव्यवस्थेत प्रत्येक घटकाचे योगदान आणि परस्परावलंबन असते. प्रश्न केवळ पैसा खर्च करण्याचा नाही, तर त्या पैशाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत किती पोहोचतो, हा आहे.

**स्थानिक खरेदीतून सर्वसमावेशक विकासम**

आज ऑनलाइन खरेदी आणि मोठ्या बाजारपेठांचे आकर्षण वाढले आहे. त्यात गैर काही नाही; मात्र दिवाळीच्या खरेदीत स्थानिक उत्पादक, छोटे दुकानदार आणि पारंपरिक कारागिरांना प्राधान्य देण्याची सामाजिक जबाबदारीही आपण स्वीकारली पाहिजे. कुंभाराकडून पणत्या, महिला बचतगटांकडून फराळ, स्थानिक विक्रेत्यांकडून फुले आणि कारागिरांकडून सजावटीच्या वस्तू खरेदी केल्या, तर पैसा स्थानिक अर्थव्यवस्थेत फिरत राहतो. यातून लहान व्यावसायिकांना बाजारपेठ मिळते आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. त्याचवेळी सणाच्या नावाखाली अनावश्यक खर्च, कर्जाचा बोजा आणि दिखाऊपणाला प्रोत्साहन देणे टाळले पाहिजे. पर्यावरणपूरक वस्तू, मातीच्या पणत्या आणि पुनर्वापर करता येणाऱ्या सजावटीच्या साहित्याचा वापर केल्यास आर्थिक व्यवहारांबरोबर पर्यावरणाचीही काळजी घेता येते.

**खऱ्या समृद्धीचा प्रकाश सर्वांच्या घरात पोहोचावा!**

दिवाळीच्या अर्थशास्त्राचा खरा अन्वयार्थ केवळ बाजारपेठेतील कोट्यवधींच्या उलाढालीत नाही, तर त्या उलाढालीतून निर्माण होणाऱ्या रोजगारात, श्रमाला मिळणाऱ्या योग्य मोबदल्यात आणि उत्पन्नाच्या न्याय्य वितरणात आहे. मोठ्या उद्योगांची भरभराट महत्त्वाची आहेच; पण त्याचबरोबर कुंभाराची चूल पेटली पाहिजे, शेतकऱ्याच्या उत्पादनाला भाव मिळाला पाहिजे, महिला बचतगटांच्या हाताला काम मिळाले पाहिजे आणि छोट्या विक्रेत्याच्या व्यवसायातही चार पैसे शिल्लक राहिले पाहिजेत. आपल्या घरातील दिवाळी उजळवताना दुसऱ्याच्या घरातही आनंदाचा दिवा लागेल, याची जाणीव ठेवणे हीच या सणाची खरी शिकवण आहे. कारण दिवाळीचा प्रकाश तेव्हाच खऱ्या अर्थाने सर्वदूर पोहोचेल, जेव्हा श्रीमंतांच्या महालापासून कुंभाराच्या झोपडीपर्यंत प्रत्येकाच्या आयुष्यात समृद्धीची पहाट उजाडेल!

# शिवीगाळ केल्याच्या कारणावरून तरुणाला मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तु सलमान जवळ मला शिवागाळ केली काय, असे म्हणुन आरोपींनी अभिजीत उल्हारे या तरुणाला शिवीगाळ करून लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. नंतर विट मारुन जखमी केल्याची घटना राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथे दि. २ नोव्हेंबर रोजी घडली.

अभिजित नंदुलाल उल्हारे, वय २१ वर्षे, रा. प्रसाद नगर, राहुरी फॅक्टरी, ता. राहुरी, या तरुणाने राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, अभिजीत उल्हारे व त्याचा मित्र यश साळवे हे दोघे दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २.३० वाजे दरम्यान त्यांचे हरवलेले कुत्र्याचे पिल्लू शोधत होते. त्यावेळी त्यांना सलमान नामक तरुण भेटला. अभिजीत उल्हारे याने त्याला विचारले कि, तु येथे कोठे कुत्र्याचे पिल्लु पाहीले का? असे म्हणाला असता त्याला त्याचा राग आल्याने त्याने शिवीगाळ केली व म्हणाला तुझ्या कुत्र्याचे पिल्लाला मी राखन आहे का? असे म्हणाला. अभिजीत उल्हारे व त्याचा मित्र यश साळवे हे दोघे थोडे पूढे गेल्यावर आरोपी मोटारसायकलवर तेथे आले आणि अभिजीत उल्हारे याला म्हणाले कि, तु सलमान जवळ मला शिवागाळ केली काय? असे म्हणुन आरोपींनी अभिजीत उल्हारे याला शिवीगाळ करून लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. नंतर विट मारुन जखमी केले. तसेच तु परत अशु सांगळेला काही म्हणाला व शिवीगाळ केली तर तुला जिवे मारुन टाकु, अशी धमकी देऊन तेथुन निघुन गेले.

घटनेनंतर अभिजित नंदुलाल उल्हारे याच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी अशु सांगळे, आदी पाळंदे, साई पाळंदे, सलमान अस्लम शेख, सर्व रा. राहुरी फॅक्टरी, ता. राहुरी व इतर ४ अनोळखी तरुण अशा आठ जणांवर गुन्हा रजि. नं. १२१८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२, १८९(२), १९०, १९१ (२) प्रमाणे शिवीगाळ व मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.



# गोदावरी कालव्यांना २० नोव्हेंबरपूर्वी आवर्तन सोडा ; आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** राज्यासह कोपरगाव मतदारसंघात दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली आहे. कोपरगाव शहरासह ग्रामीण भागातील पाणी पुरवठा करणाऱ्या साठवण तलावातील पाणी संपत आले आहे. तसेच चारा पिकांना आणि रब्बी हंगामातील पिकांना देखील पाण्याची आवश्यकता भासत असल्यामुळे गोदावरी कालव्यांना २० नोव्हेंबरच्या आत आवर्तन सोडावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाडरे केली आहे.

दिलेल्या निवेदनात आ. आशुतोष काळे यांनी पुढे असे म्हंटले आहे कि, कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत गोदावरी कालव्यांना रब्बी हंगामातील पहिले आवर्तन १ डिसेंबरला सोडण्याचा निर्णय झाला आहे. परंतु गोदावरी कालव्यांच्या लाभ क्षेत्रात कमी पर्जन्यमानामुळे नागरिकांचा आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट होत चालला आहे. याच बरोबर पाणी पुरवठा करणाऱ्या योजनांच्या साठवण तलावांनी तळ गाठल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. कोपरगाव शहरातील नागरिकांना पाणी पुरवठा करणाऱ्या साठवण तलावांनी देखील तळ गाठल्यामुळे नागरिकांना सहा दिवसांनी पाणी पुरवठा होत आहे. तसेच मिळणाऱ्या आवर्तनाच्या भरवशावर लाभ धारक शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची व चारा पिकांची लागवड केली असून या पिकांना जर वेळेत पाणी मिळाले नाही तर त्यांचे देखील भवितव्य खरीप पिकांप्रमाणे धोक्यात येऊ शकते. कमी पर्जन्यमानामुळे भूजल पातळी मोठ्या प्रमाणावर खालावली असल्याने विहिरी आणि बोअरवेल मधून पाणी उपलब्ध होईल या अपेक्षा संपल्यात जमा आहे. त्यामुळे एकूण परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून १ डिसेंबरची वाट न पाहता २० नोव्हेंबरपूर्वीच गोदावरी कालव्यांना आवर्तन सोडावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.



# बंधारे भरण्यासाठी निळवंडे कॅनॉलवर आणखी व्हॉल्व बसवा : स्नेहलताताई कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** रांजणगाव देशमुख परिसरातील शेती आणि गावांच्या पाणीप्रश्नाला दिलासा मिळावा, तसेच परिसरातील के.टी. वेअर व माती बंधारे पाण्याने भरता यावेत, यासाठी निळवंडे कालव्याच्या पाणी वितरण व्यवस्थेत आवश्यक बदल करण्याची मागणी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी निळवंडे कालव्याचे कार्यकारी अभियंता शेख यांच्याशी चर्चा करून अंजनापूर म्हसोबा मंदिराजवळ, जवळके हायस्कूलच्या मागील बाजूस आणखी व्हॉल्व काढण्याची सूचना केली. सध्या रांजणगाव देशमुखजवळ निळवंडे कॅनॉलवरून बंधारे भरण्यासाठी एक व्हॉल्व काढण्यात आलेला आहे. मात्र, या एकाच व्हॉल्वडरे अंजनापूर, धोंडेवाडी, जवळके आणि बहादराबाद या गावांमधील सर्व के.टी. वेअर तसेच माती बंधारे भरणे शक्य होणार नाही. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन होण्याबरोबरच प्रत्येक गावातील बंधाऱ्यांपर्यंत पाणी पोहोचणे आवश्यक आहे. सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग स्थानिक पातळीवर व्हावा, यासाठी नियोजनबद्ध पाणी वितरण करणे गरजेचे आहे. संबंधित विभागाने या सूचनेची गांभीर्याने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी आणि अंजनापूर म्हसोबा मंदिराजवळ दुसरा व्हॉल्व काढण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी आग्रही भूमिका स्नेहलताताई कोल्हे यांनी मांडली आहे.



# संत, कीर्तनकारांच्या गोदावरी परिक्रमा यात्रेची सांगता, ४० साधकांचा सहभाग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख महंत भगवानजी महाराज जंगले शास्त्री यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या वारकरी संप्रदायातील संत, कीर्तनकार आणि साधकांच्या श्री गोदावरी परिक्रमा यात्रेची बुधवारी (दि. ४) टोका-प्रवरासंगम येथील सिद्धेश्वर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरणात सांगता झाली. या तेरा दिवसांच्या यात्रेत अहिल्यानगर जिल्ह्यासह विविध भागांतील सुमारे ४० संत आणि साधक सहभागी झाले होते. महंत भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली टोका-प्रवरासंगम येथे गंगापूजन करून या परिक्रमेला प्रारंभ झाला होता. यात्रेदरम्यान दररोज पहाटे गोदावरी स्नान, आरती, काकडा भजन, अखंड नामजप, हरिपाठ, कीर्तन आणि सायंकाळी आरती असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. गोदावरी नदीच्या उगमस्थानी असलेल्या त्र्यंबकेश्वर-ब्रह्मगिरीपासून उत्तर तटाने पुढे तेलंगणा, आंध्र प्रदेशातील नदीच्या सागर संगमापर्यंत जाऊन दक्षिण तटाने परतीचा प्रवास अशा स्वरूपाची ही परिक्रमा होती. बुधवारी प्रवरासंगम येथे संत-महंतांच्या उपस्थितीत वेदमंत्रांच्या जयघोषात गोदावरी मातेच्या जलाचे पूजन करून यात्रेची सांगता करण्यात आली.

या परिक्रमेच्या माध्यमातून जलसंवर्धन, नदीस्वच्छता आणि भारतीय धार्मिक-सांस्कृतिक परंपरेच्या जतनाचा संदेश जनमानसात पोहोचविण्यात आला. यावेळी नंदकिशोर महाराज खरात, श्रीराम महाराज झिंजुर्के, ब्रह्मानंद गिरी महाराज, गहिनीनाथ महाराज आढाव यांच्यासह जिल्ह्यातील अनेक संत, महंत आणि वारकरी उपस्थित होते.

# सेवानिवृत्तीनंतरही विद्यार्थ्यांप्रती मायेचा ओलावा कायम

## गवसणे-कापसे दाम्पत्याचा सेवाभावी उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शिक्षक म्हणून नोकरी करताना विद्यार्थ्यांना ज्ञानदान करायचे आणि सेवानिवृत्तीनंतरही त्यांच्याप्रती असलेली सामाजिक बांधिलकी जपायची, हा आदर्श विष्णूपंत गवसणे व जयश्री गवसणे-कापसे या शिक्षक दाम्पत्याने आपल्या कृतीतून घालून दिला आहे. सेवानिवृत्तीनंतरही गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा त्यांचा संकल्प कायम असून, दरवर्षी आपण ज्या-ज्या शाळांमध्ये सेवा बजावली, त्या शाळांतील गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्याचा उपक्रम ते राबवत आहेत.



याच सामाजिक जाणिवेतून त्यांनी देवळाली प्रवरा येथील पी.एम.श्री जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून आपल्या सेवाभावी उपक्रमाची परंपरा यंदाही पुढे सुरू ठेवली.

विष्णूपंत गवसणे यांनी २००० ते २०१२ या कालावधीत, तर जयश्री गवसणे-कापसे यांनी १९९१ ते २०११ या कालावधीत देवळाली प्रवरा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून सेवा बजावली. गवसणे हे २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाले. मात्र, शिक्षक म्हणून शाळेतून बाहेर पडल्यानंतरही विद्यार्थ्यांशी असलेले त्यांचे भावनिक नाते कायम आहे. जयश्री गवसणे-कापसे या आजही मराठी शाळेत अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

अनेकदा पद, प्रतिष्ठा आणि नोकरीची जबाबदारी संपल्यानंतर सामाजिक बांधिलकीही मागे पडते; मात्र या दाम्पत्याने सेवानिवृत्तीनंतरही गरजू विद्यार्थ्यांची काळजी घेण्याचे व्रत जपले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा येऊ नये, या भावनेतून ते दरवर्षी शालेय साहित्य वाटप करतात.

ज्ञानदानाबरोबरच समाजऋणाची जाणीव जपणाऱ्या या दाम्पत्याचा उपक्रम केवळ साहित्य वाटपापुरता मर्यादित नसून,तो शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्याचे तसेच माणुसकीच्या संस्कारांचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# नेवासा पंचायत समितीच्या कारभारात सावळा गोंधळ

## विद्यार्थ्यांसह दलित वस्त्यांचे प्रश्न प्रलंबित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा पंचायत समितीच्या कारभारात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचा आरोप होत असून, विविध मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः जिल्हा परिषद शाळांमधील शौचालयांचा प्रश्न आणि दलित वस्ती विकास निधीच्या वापराबाबत गंभीर तक्रारी पुढे आल्या आहेत. तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये अद्याप शौचालयांची सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. शौचालयांच्या प्रश्नाबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी ग्रामप्रशासन, शिक्षण विभाग आणि गटविकास अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप आहे. तसेच दलित वस्ती विकास निधीचा शासन निर्णयानुसार विनियोग होत नसल्याच्या तक्रारी असून, काही वस्त्यांमध्ये पथदिव्यांना विद्युत दिवे नसल्याने अंधाराचे साम्राज्य आहे. या प्रश्नांबाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. काही दिवसांपूर्वी प्रश्न मांडण्यासाठी गेलेल्या पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांना अपमानास्पद वागणूक मिळाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या सर्व प्रकारांची जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी, प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# प्रवरेच्या पाच विद्यार्थ्यांची पदव्युत्तर पदवी शिक्षणासाठी निवड



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील पद्मभूषण उपाधीने सन्मानित प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषि शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या य कृषी महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांची पदव्युत्तर पदवी शिक्षणासाठी निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल खडके यांनी दिली.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या सामायिक प्रवेश परीक्षा (उएढ) मध्ये उत्कृष्ट यश संपादन केल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या गुणवत्ता यादीच्या आधारे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

यामध्ये मनिषा झाल्टे हिची कृषी कीटकशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवीसाठी कृषी महाविद्यालय, लातूर येथे, तर साक्षी खरसे हिची पशुधन उत्पादन व व्यवस्थापन या विषयातील पदव्युत्तर शिक्षणासाठी कृषी महाविद्यालय, लातूर येथे निवड झाली आहे. भक्ती कोते हिची कृषी महाविद्यालय, पुणे येथे एम.बी.ए. (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) या पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड झाली आहे. तसेच प्रफुल्ल काळे आणि पूजा जेजुरकर यांची कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, चाकूर येथे एम.बी.ए. (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, कृषि संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा कृषी शास्त्र संस्था विविध उपक्रम राबवत असते.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे आणि प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आर्ले पाटील अर्बन पतसंस्थेच्या संचालकपदी एकनाथराव कावरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** सहकार क्षेत्रात विश्वासार्हता, आर्थिक शिस्त आणि ग्राहकाभिमुख कारभाराच्या जोरावर आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील आर्ले पाटील अर्बन सहकारी पतसंस्थेच्या संचालकपदी माजी सरपंच एकनाथराव कावरे पाटील यांची निवड करण्यात आली आहे.



दिवाळी सणाचे औचित्य साधून आर्ले पाटील पतसंस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही सर्व सभासद व खातेदारांना मिठाईचे वाटप करण्यात आले, तर कर्मचाऱ्यांना बोनस देऊन दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.नवनिर्वाचित संचालक एकनाथराव कावरे पाटील यांनी दोन वेळा कुकाणा गावाचे सरपंचपद भूषविले असून, बाजार समितीचे उपसभापती म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

तसेच पाणी वापर संस्थेसह विविध सहकारी आणि सामाजिक संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. ग्रामीण विकास, सहकार क्षेत्र आणि संस्थात्मक कामकाजाचा त्यांना मोठा अनुभव आहे. त्यांच्या या अनुभवाचा उपयोग पतसंस्थेच्या कामकाजाला दिशा देण्यासाठी आणि भविष्यातील विस्तारासाठी होणार आहे. अनुभवी नेतृत्वाची संचालक मंडळात झालेली निवड ही संस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

दिवाळीनिमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक डॉ. गणेश आर्ले, चेअरमन सौ. मीना आर्ले, संचालक डॉ. यशवंत गवळी, डॉ. अरुण वाबळे, श्रीमती रंजना कांडेकर आणि बाळासाहेब कोलते यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना बोनस व मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवर प्रदीप भंडारी, भागवत खराडे, डॉ. सुभाष भागवत, किशोर मिसाळ यांची उपस्थिती होती.

संस्थेच्या यशस्वी वाटचालीमध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असून, त्यांच्या मेहनतीची आणि निष्ठेची दखल घेत दरवर्षीप्रमाणे यंदाही बोनस वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. त्याचबरोबर सभासद आणि खातेदारांशी असलेले आपुलकीचे नाते अधिक दृढ व्हावे, या भावनेतून मिठाई वाटप करण्यात आले. संस्थेच्या वतीने सर्व सभासद, खातेदार आणि ग्राहकांना दीपावलीच्या शुभेच्छाही देण्यात आल्या. नवीन संचालकांची निवड, अनुभवी नेतृत्वाचे मार्गदर्शन आणि कर्मचारी व सभासदांशी जपलेले आपुलकीचे नाते या माध्यमातून आर्ले पाटील अर्बन पतसंस्था सहकार क्षेत्रातील आपली वाटचाल अधिक भक्कम करण्याच्या दिशेने प्रयत्नशील असल्याचे या कार्यक्रमातून दिसून आले.

# चांदेकसारे विकास सोसायटीकडून सभासदांना १२ टक्के लाभांशाचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगांव :** कोपरगाव तालुक्यातील अग्रगण्य सहकारी संस्थांमध्ये ओळख असलेल्या चांदेकसारे विकास सोसायटीच्या वतीने चालू वर्षीही सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार ४ नोव्हेंबर रोजी संस्थेच्या कार्यालयात सभासदांना १२ टक्के लाभांशाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे सभासदांची दिवाळी अधिक गोड झाली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सुभाष होन यांनी दिली.

संस्थेच्या संचालक मंडळाने सभासदांच्या आर्थिक हिताला प्राधान्य देत यंदाही लाभांश देण्याची परंपरा कायम ठेवली



आहे. ठरल्याप्रमाणे सभासदांना लाभांशाचे वितरण करण्यात आले. यावेळी लाभांशासोबत मिठाईचे वाटप करून दिवाळीच्या शुभेच्छाही देण्यात आल्या. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ होन, संचालक सुभेदार शांतीलाल होन, जिल्हा खरेदी-विक्री संघाचे संचालक जयद्रथ होन, मोहन होन, संस्थेचे सचिव विजय खरात आदी उपस्थित होते. संस्था ही सभासदांची जननी आहे. सभासदांनी संस्थेमार्फत आवश्यकतेनुसार कर्ज घ्यावे आणि घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करावी. यामुळे संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत होण्यास मदत होते, तसेच सभासदांचाही आर्थिक फायदा होतो. सभासद आणि संस्था यांच्यातील आर्थिक विश्वासाचे नाते अधिक दृढ होणे गरजेचे आहे, असेही अध्यक्ष सुभाष होन यांनी सांगितले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# खांबा गावाच्या जलसिंचन योजनेच्या निकृष्ट कामाचा पर्दाफाश

## आमदार अमोल खताळ संतप्त । गाडलेली पाइपलाइन उकरून दर्जा तपासण्याचे आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्याच्या पठारभागातील खांबा गावाला पाणीपुरवठा करण्या साठी मुळा धरणातून सुमारे सहा कि मीं अंतरावरून पाणी आणण्याच्या उद्देशाने कामधेनू उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्यात आली आहे. मात्र, या योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी आ. अमोल खताळ त्यांच्यासमोर केल्या या तक्रारींची गंभीर दखल घेत आ. खताळ यांनी जलसंधारण विभागा च्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. आणि जमिनीत गाडलेली संपूर्ण पाइपलाइन उकरून प्रत्यक्ष कामाचा दर्जा तपासण्याचे स्पष्ट निर्देश दिले. कामात अनियमितता आढळल्यास संबंधित ठेकेदार कंपनीविरोधात कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.



खांबा गावासाठी सन २०२४ मध्ये सुमारे १६ कोटी रुपये खर्चाची कामधेनू उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्यात आली. मात्र, गेल्या दीड ते दोन वर्षांपासून या योजनेचे काम सुरू असूनही अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. त्यामुळे कामाच्या दर्जा बाबत आणि विलंबाबाबत ग्रामस्थां मध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या योजनेच्या कामाची पाहणी करताना संबंधित पाइपलाइनचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे ग्रामस्थांनी आमदार खताळ यांच्या निदर्शनास आणून दिले. पाइपलाइनच्या कामातील त्रुटींबाबत ग्रामस्थांनी प्रत्यक्ष परिस्थिती दाखवत आपली भूमिका मांडली. जलसंधारण विभागाला कुठल्याही प्रकारची पूर्वकल्पना न देता संबंधित ठेकेदाराने पाइपलाइन जमिनीत बुजवून टाकल्याचा आरोप ही ग्रामस्थांनी केला.या तक्रारींची दखल घेत आमदार खताळ यांनी केवळ वरवरची पाहणी करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कामाची सत्य परिस्थिती समोर आली पाहिजे, अशी भूमिका घेतली. या योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदाराने जमिनीत गाडलेली संपूर्ण पाइपलाइन उकरून काढावी आणि तिच्या कामाचा दर्जा तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, असे निर्देश त्यांनी जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

योजनेच्या कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. पाईपलाईन कामात हलगर्जीपणा किंवा नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित ठेकेदाराविरुद्ध रीतसर कायदेशीर कारवाई करावी. तसेच, पाइपलाइनच्या कामासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री जप्त करण्याबाबतही आवश्यक ती कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.या वेळी जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे, कनिष्ठ अभियंता सनी पगार आणि शाखा अभियंता शुभम गाडेकर उपस्थित होते. आता आमदार खताळ यांच्या निर्देशानंतर संबंधित विभागाकडून काय कारवाई केली जाते आणि ठेकेदारावर कोणती कारवाई होते याकडे खांबा ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## द•ख•ल

### अंध व बहुविकलांग विद्यार्थ्यांना डी पॉल हायस्कूलकडून मदतीचा हात

**श्रीरामपूर** : येथील विन्सेंशन मिशन सर्विस सोसायटी संचलित डी पॉल इंग्लिश मिडीयम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर येथील दि नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड अर्थात अंध व बहुविकलांग शाखेच्या विद्यार्थ्यांमार्फत बनविलेल्या गृह सजावटीच्या आकर्षक वस्तूंची भरगच्च खरेदी करून नुकताच अंध व बहुविकलांग विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीचा हात दिला. दरम्यान अंध व बहुविकलांग विद्यार्थ्यांनी डी पॉल स्टेट बोर्ड हायस्कूल श्रीरामपूर येथे एकदिवसीय दिपावली सणाचे औचित्य साधून गृह सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तूंचे भव्य विक्री प्रदर्शन ठेवले होते.

प्रदर्शनामध्ये आकर्षक रंगीबेरंगी आकाश कंदील,सुबक पणत्या,विद्युत रोषणाई करणाऱ्या दिव्यांच्या माळा,तोरण,फुलांच्या माळा अशा आकर्षक वस्तू विक्रीसाठी ठेवल्या होत्या.प्रसंगी डी पॉल शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी,शिक्षक,पालक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी सदर वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी करून श्रीरामपूरकर वासियांच्या नजरेसमोर एक नवा आदर्श ठेवला.प्रसंगी अंध व बहुविकलांग श्रीरामपूर शाखेचे सुनील सातपुते,सुनिता वढणे,प्रशांत पंडित,पद्मनाथ वाघमारे,पुरुषोत्तम जोशी उपस्थित होते.

### डाळींब पिकासाठी रोग व कीड व्यवस्थापनाची गरज : डॉ खैरे



**पुणतांबा** : डाळींब पिकाचे ज्यादा उत्पादन घेण्यासाठी विविध रोग व किडीच्या प्रादुर्भावावर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी चांगले पिक व्यवस्थापन केले पाहिजे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठातील वनस्पती रोग शास्त्र व अनुजीवशास्त्र विभागातील संशोधन सहयोगी डॉ प्रवीण खैरे यांनी केले. परिसरातील रामपूरवाडी शिवारातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांची थेट बागेत जाऊन त्यांच्याशी संवाद साधतांना ते मार्गदर्शन करत होते.

त्यांनी प्रत्यक्ष डाळींब बागेत फिरून बागेतील विविध समस्यांची पाहणी करून बुरशीजन्य रोंगाचा व किडींचा प्रार्दुभाव तसेच रोंगाच्या प्रभावी नियंत्रणा साठी कराव्यांच्या उपाय योजनांची माहिती दिली. डांळीब पिकांमध्ये रोग व किडीचे वेळीच व्यवस्थापन केल्यास आर्थिक नुकसान टाळून दर्जेदार उत्पादन घेणे शक्य असल्याचे स्पष्ट केले तसेच शेतकऱ्यांनी डाळींब पिकाबाबद आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतल्यास त्याचा पिकाचे संरक्षण व उत्पादन वाढीस मदत होणार आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठांचे कुलगुरू संशोधन संचालक वनस्पती रोगशास्त्र व कृषी किटक शास्त्र विभागाचे प्रमुख संशोधन सहभागी प्राध्यापक यांच्या मार्गदर्शना खाली डाळींब उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी बागेत जाऊन मार्गदर्शन केले जात आहे याचा डॉ खैरे यांनी आर्वजून उल्लेख केला.

### हरेगाव येथे सार्वजनिक विभागाच्या जागेवरील अतिक्रमण त्वरित हटवावे : वाहूळ

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या जागेवर मुख्य रस्त्यालगत झालेले अतिक्रमण त्वरित हटवण्यात यावे अशी मागणी रवींद्र वाहूळ व अनेक त्रस्त नागरिकांनी केली आहे. हरेगाव येथील मुख्य रस्त्यालगत विटा सिमेंट वाळूचे पक्के बांधकाम करून वाहतुकीस अडथळा निर्माण करण्यात आला आहे.

त्यामुळे ग्रामस्थ नागरिकांना ये जा करण्यासाठी सर्व वहिवाट बंद झाली आहे सर्व नागरिकांना मुख्य रस्त्यावरून ये जा करावी लागते. शाळेतील विद्यार्थी कॉलेजचे विद्यार्थी कामाला जाणारे मजूर शेतकरी व्यापारी आठवडे बाजाराला जाणारे नागरिक, आरोग्य केंद्र बँक पोलीस आऊट पोस्ट ग्रामपंचायत हरेगाव अंगणवाडी पिण्याचे पाणी बुद्ध विहार मज्जित या सर्व ठिकाणी जाण्यासाठी सर्व नागरिकांना मुख्य रस्त्याचा वापर करावा लागत आहे.

येथे खूप मोठी गर्दी असते परिणामी एखाद्या वेळेस अपघात होतात याबाबत संबंधितांना अतिक्रमण काढण्याबाबत विचारणा केली असता अरेरावीची भाषा करतात व वाद होतात. याबाबत उपविभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग श्रीरामपूर यांनी तातडीने बेकायदेशीर झालेल्या अतिक्रमणाची तात्काळ पाहणी करून सर्व दुकानदारांवर योग्य ती कारवाई करावी व झालेले अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात काढून टाकावे, अन्यथा हरेगाव ग्रामस्थ नागरिक सार्वजनिक बांधकाम उपविभागीय उपविभाग श्रीरामपूर कार्यालय समोर तीव्र आंदोलन करतील असा इशारा नागरिकांनी दिला आहे निवेदनाची प्रत संबंधितांना दिली आहे.

### उंदीरगाव येथे शासनाच्या चारा टंचाई उपायोजनेअंतर्गत मका बियाणे वाटप

**शिरसगाव** : शेतकरी संघटना उंदीरगाव यांच्या वतीने शासनाच्या चारा टंचाई उपायोजना अंतर्गत पशुसंवर्धन विभागामार्फत मका बियाणे वाटप आज दि. ६ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता उंदीरगाव ग्रामपंचायत हॉल येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी शेतकरी संघटना राज्य उपाध्यक्ष अजित काळे प्रमुख अतिथी हे उपस्थित राहणार आहे तसेच तालुका कृषी अधिकारी उल्हास राक्षे, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी जगदीश खेडकर, माजी चेअरमन सुरेश गलांडे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती राजेंद्र पाऊलबुद्धे ,संचालक वीरेश पाटील गलांडे, तालुका उपक्रुषी अधिकारी निलेश बिबवे, पशुवैद्यकीय अधिकारी मातापुर डॉ. प्रमोद निकम, कृषी सहाय्यक उंदीरगाव विकास पटारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सुरेश पाटील गलांडे ,राजेंद्र पाटील पाऊलबुद्धे सचिन वेताळ आदींनी केले आहे.

## खंडाळ्यातील सात अंगणवाडीत खुर्च्यांची भेट; ८० हजारांचे सामाजिक योगदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : दातृत्वाची श्रीमंती पैशाने नव्हे, तर मनाने मोजली जाते, याचा प्रत्यय खंडाळा येथील तरकसे कुटुंबाने दिला आहे. कुटुंबातील दिवंगत कै. सुमन ज्ञानदेव तरकसे यांची गावातील सातही अंगणवाड्यांतील विद्यार्थ्यांना खुर्च्या भेट देण्याची शेवटची इच्छा होती. त्यांच्या निधनानंतर नातू विशाल तरकसे यांनी ही इच्छा पूर्ण करून सामाजिक बांधिलकी जपली. कै. सुमन तरकसे यांच्या कामातून मिळालेली रक्कम समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. त्यानुसार विशाल तरकसे यांनी गावातील सात अंगणवाड्यांमधील सुमारे १५० विद्यार्थ्यांसाठी तसेच अंगणवाडी सेविका व शिक्षिकांसाठी १४ खुर्च्या भेट दिल्या. या खुर्च्यांची एकूण किंमत सुमारे ८० हजार रुपये आहे. या उपक्रमामुळे चिमुकल्यांना बसण्याची सुविधा उपलब्ध झाली असून आजीची अंतिम इच्छा पूर्ण झाली आहे. यावेळी अंगणवाडी प्रकल्प अधिकारी आशाताई शिंदे, ग्रामसेविका स्वप्नाली गागरे, सीमा ढवळे, कल्पना फसाटे, रमेश तरकसे, शंकर अण्णा, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वसामान्य परिस्थितीतही समाजासाठी मोठे योगदान देता येते, हे तरकसे कुटुंबाने कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

## नऊ तारखेपर्यंत ऊसदर जाहीर करा, अन्यथा जिल्हाभर चक्काजाम !

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : २०२६-२७ च्या गळीत हंगामाचा ऊसदर येत्या ९ नोव्हेंबरपर्यंत जाहीर करावा, अन्यथा जिल्हाभर चक्काजाम आंदोलन छेडण्यात येईल, असा आक्रमक इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रवी मोरे यांनी दिला. अहिल्यानगर येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांनी ऊस उत्पादकांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली.

यावेळी उसाला प्रतिटन चार हजार रुपये भाव देण्याची मागणी करण्यात आली. कारखान्यांनी वजनकाट्यांवर पारदर्शकता ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे व वजनाचे दर्शनी फलक बसवावेत, ऊसतोडणी व वाहतुकीच्या नावाखाली होणाऱ्या



कपातीची तपासणी करावी, तसेच मागील हंगामातील थकीत एफआरपी तातडीने द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

संभाजी माळवदे, नरेंद्र काळे यांच्यासह विविध संघटनांच्या प्रतिनिधींनीही शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. चौदा दिवसांपेक्षा अधिक काळ थकीत राहणाऱ्या रकमेवर १५ टक्के व्याज देण्याची मागणीही करण्यात आली.

बैठकीत कोणताही ठोस निर्णय न झाल्याने शेतकऱ्यांनी घोषणाबाजी केली. यावर पालकमंत्र्यांनी ९ नोव्हेंबरपूर्वी ऊसदर जाहीर करण्याचे आश्वासन दिले. मात्र, तोपर्यंत निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार स्वाभिमानी शेतकरी संघटनेने व्यक्त केला.

## बालसंगोपन योजना आता ऑनलाइन । दोन लाख बालकांना दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महिला व बालविकास विभागाची क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना आता पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. त्यामुळे लाभार्थी बालकांच्या पालकांची होणारी धावपळ थांबणार असून योजनेच्या अंमलबजावणीला गती मिळणार आहे. राज्यातील सुमारे दोन लाख आठ हजार बालकांना याचा लाभ होणार आहे.

यापुढे लाभार्थ्यांना महाडीबीटी संकेतस्थळावरून थेट ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अर्ज भरण्यापासून कागदपत्रांची नोंदणी आणि अर्जाची सद्यस्थिती तपासण्यापर्यंतची प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली आहे. तसेच आवश्यक कागदपत्रांची संख्याही कमी करण्यात आली आहे.

या योजनेतील पात्र बालकांना दरमहा २ हजार २५० रुपये, तर कोरोना काळातील लाभार्थ्यांना ४ हजार रुपये दिले जातात. हा लाभ थेट बँक खात्यात जमा केला जातो. योजना ऑनलाइन करण्यासाठी मिशन वात्सल्य समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे, हेरंब कुलकर्णी आणि सहकाऱ्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्था किंवा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाकडून सामाजिक तपासणी केली जाईल. त्यानंतर बालकल्याण समिती पात्रता पडताळून लाभ मंजुरीचा निर्णय घेईल. त्यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

## राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत सूर्या काकडेला रौप्यपदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोनई** : सोनई-लांडेवाडी रस्त्यावरील सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता बारावीचा विद्यार्थी सूर्या कमलेश काकडे याने राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धेत रौप्यपदक पटकावून उल्लेखनीय यश मिळविले आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाच्या वतीने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी बारामती येथील जिल्हा क्रीडा संकुलात राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत १९ वर्षांखालील वयोगटात सूर्याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक मिळविला होता. या कामगिरीच्या जोरावर त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. दिल्ली येथे १ ते ५ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सूर्याने विविध राज्यांतील प्रतिस्पर्ध्यांशी अटीतटीचे सामने खेळले. अचूक फटके, प्रभावी सर्व्हिस आणि संयमी खेळाच्या जोरावर त्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत रौप्यपदकाला गवसणी घातली. त्याच्या या यशाचे श्रेय त्याने नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, क्रीडाशिक्षकांचे सहकार्य आणि पालकांच्या प्रोत्साहनाला दिले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरण सोनवणे, प्राचार्य ज्योती सोनवणे, शिक्षक, प्रशिक्षक आणि पालकांनी सूर्याचे अभिनंदन केले.

**हरवले आहे**

मी **तेजस रावसाहेब गोडगे** यांचे माझे **Registration Certificate No. (IV-4883)** हे दि. ११/१०/२०२६ रोजी लोणी परिसरात गहाळ झाले आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर किंवा लोणी पोलीस स्टेशनला संपर्क करावा ही विनंती, तसेच मी निबंधक महाराष्ट्र परिषद यांना ही विनंती करतो की, माझे नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत मला तुरंत मिळावी ही विनंती.

**संपर्क : तेजस रावसाहेब गोडगे मो. नं. ९९७०८ ००३९५**

पत्ता : मु. पो. लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहिल्यानगर.

## भारताला सुवर्णपदक मिळवून देणारे शिवम पटारेची भव्य मिरवणूक व सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : कॉमनवेल्थ कबड्डी चॅम्पियनशिप भारताला सुवर्णपदक मिळवून देणारे शिवम पटारे यांची टाकळीभान येथे ग्रामस्थांच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली व भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

कबड्डी खेळाचे माहेरघर असलेल्या टाकळीभानचा भूमिपुत्र प्रो कबड्डी स्टार खेळाडू शिवम अनिल पटारे याची कॉमनवेल्थ कबड्डी चॅम्पियनशिपसाठी भारतीय पुरुष संघात खेळून अहमदाबाद येथे दि.२१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत झालेल्या कॉमनवेल्थ कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेसाठी वरिष्ठ पुरुष खेळाडू ,टाकळीभानचा प्रो स्टार कबड्डी खेळाडू शिवम अनिल पटारे याने भारताला सुवर्णपदक मिळवून दिले , व आपल्या गावी प्रथमच त्याचे आगमनाबद्दल बस स्टँड शेजारी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची आरती शिवम पटारे यांच्या हस्ते करण्यात आली. व तदनंतर ग्रामस्थांच्या वतीने भव्य मिरवणूक कढुन भव्य शिवमचा सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी कबड्डी खेळाडू, क्रीडाप्रेमी ग्रामस्थ यांनी फटाके वाजून जल्लोष व आनंद साजरा केला. टाकळीभान व महाराष्ट्रासाठी हा अभिमानाचा क्षण असून याच गावचा भूमिपुत्र भारत देशाला आशिया ऑलम्पिक कबड्डी स्पर्धेमध्ये दोन गोल्ड मेडल मिळवून देणारा खेळाडू असलम इनामदार व त्या पाठोपाठ प्रो स्टार कबड्डी खेळाडू शिवम पटारेच्या या यशामुळे टाकळीभानची मान पुन्हा एकदा कबड्डी क्षेत्रात अभिमानाने उंचावली आहे. भारतीय कबड्डी संघाला या टाकळीभानच्या मातीने उत्कृष्ट व दर्जेदार कबड्डी खेळाडू दिल्याने येथील ग्रामस्थांमध्ये व कबड्डी क्रीडाप्रेमी मधून आनंदाचे वातावरण आहे.

शिवमच्या या यशाबद्दल प्रा. माणिकराव राठोड, अनिलराव जगदाळे, दत्ता (आबा ) टेके. राहूल कोकणे, वसिम इनामदार, उपसरपंच कान्हा खंडागळे, सोसायटीचे चेअरमन राहुल पटारे, मार्केट कमिटीचे संचालक मयूर पटारे,युवक नेते भाऊसाहेब पवार, राष्ट्रवादी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, अनिलराव पटारे सर,माजी प्राचार्य जयकर मगर, किरणराव धुमाळ, रवी गाडे, भैया पठाण, राहुल कोकणे,भाऊसाहेब पटारे,प्रा. बद्रीनाथ पटारे, संभाजी पटारे, धावपटू , एकनाथ पटारे, अनिल बोडखे, बालाजी पटारे, सुजित बोडखे ,काकासाहेब डिके, पंकज जाधव,अशोकराव पटारे, प्रतापराव पटारे, शिवाजी पटारे, सुभाष पटारे, संदीप जावळे, मयूर लोखंडे आदी सह उपस्थित होते.

## सैनिक स्कूलच्या पाच कॅडेट्सची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूलच्या कॅडेट्सनी विभागीय स्तरावरील जलतरण आणि जलपोलो स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे शाळेच्या पाच कॅडेट्सची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अहिल्यानगर येथे झालेल्या विभागीय जलतरण स्पर्धेत साईराज अदनाक, राजवर्धन पाटील, श्रेय गांधी, अर्णव पळशीकर आणि अंश काळे यांनी विविध प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या या यशामुळे त्यांना राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळाली आहे.

दरम्यान, विभागीय जलपोलो स्पर्धेत अहिल्यानगर संघाने रौप्यपदक पटकावत द्वितीय क्रमांक मिळविला. पुणे शहर संघाने सुवर्ण, अहिल्यानगर संघाने रौप्य, तर पुणे ग्रामीण संघाने कांस्यपदक मिळविले. या सांघिक कामगिरीच्या जोरावर राजवर्धन पाटील आणि अंश काळे यांची नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय जलपोलो निवड चाचणीसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी, अधिकारी व प्राचार्यांनी सर्व यशस्वी कॅडेट्सचे अभिनंदन केले.

## रमा वद्य एकादशीच्या निमित्त सुमारे एक लाख भाविकांकडून माऊलींच्या पैस खांबाचे दर्शन




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : वसू बारशेच्या दिवशी आलेल्या रमा वद्य एकादशीच्या निमित्ताने गुरुवारी नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील माऊलींच्या पैस खांबाचे दिवसभरात सुमारे एक लाख भाविकांनी दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करत माऊलींच्या मंदिरात हजेरी लावली. माऊलींच्या एकादशीच्या निमित्ताने दिंड्या घेऊन आलेल्या हजारो वारकऱ्यांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त व प्रमुख वेदांताचार्य महंत हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे, रामभाऊ जगताप, विश्वासराव गडाख, भिकाजी जंगले, कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव यांनी स्वागत केले.

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या वद्य एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊलीच्या पैसखांबास सागर महाराज टेमक यांच्या हस्ते सपत्नीक वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला.दुपारच्या सत्रात आलेल्या भाविकांना शेवगाव येथील व्यापारी व देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांचे भक्त कुमार भोंडे व रामनाथ डोहळे यांच्या वतीने शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले. रमा वद्य एकादशीचे औचित्य साधून माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी,संत ज्ञानेश्वर माऊली पैस खांब,भगवान दत्तात्रय,करविरेश्वर, वैकुंठवाशी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर परिसर गर्दीने गजबजून गेला होता.मंदिर परिसरात विविध दुकाने उभारण्यात आल्याने यात्रेचे स्वरूप परिसराला प्राप्त झाले होते.

एकादशी निमित्त शेकडो दिंड्यांनी येथे ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोष करत हजेरी लावली वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या हस्ते आलेल्या दिंडीतील चालकांचा श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला.रात्री रमा वद्य एकादशीच्या निमित्ताने पिचडगाव येथील माऊली आश्रमाचे प्रमुख महंत हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांचे हरी किर्तन झाले. कीर्तनाला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना शेवगाव येथील दत्तात्रय वाबळे सर यांच्या वतीने शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले.

## पान १ वरुन

### कपाशीच्या शेतात गांजाची लागवड

सदरची कामगिरी जिल्हा पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, कर्जतचे उपविभागीय पोलिस अधीकारी सुजितकुमार क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली मिरजगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, पोलिस उपनिरीक्षक किरण जगदाळे व पोलीस अंमलदार गणेश ठोंबरे, पोलिस कॉन्स्टेबल सुनिल खैरे, गोकुळ पळसे, अमित बरडे, स्वाती जगधने, चालक राहुल सपट तसेच उपविभागीय पोलीस अधीकारी कार्यालय कर्जत येथील मनोज लातुरकर व सागर जंगम यांनी केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक किरण जगदाळे हे करत आहेत.

या कारवाईमुळे कर्जत तालुक्यातील गांजा लागवडीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सदर गांजाचे कारवाई केल्याचे अनुषंगाने मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत गांजाची लागवड किंवा विक्री संदर्भात सर्व नागरिकांना अंमली पदार्थ बाळगणा-या ईसम ांबाबत माहिती देण्याचे मिरजगाव पोलीसांकडून आवाहन करण्यात येत असुन, माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

### न्यायासाठी गर्भवती महिलेची लेकरांसह मंत्रालयाकडे पायपीट!

महादेव आणि सासू ताराबाई जखमी झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. पतीला जीवे मारण्याची धमकी दिल्याने ते गेल्या सहा म हिन्यांपासून गावाबाहेर राहत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रकरणी पोलीस ठाण्यासह ग्रामपंचायत, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडे वारंवार तक्रारी करूनही न्याय मिळाला नसल्याची त्यांची व्यथा आहे. उलट आपल्याविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. २६ ऑक्टोबर रोजी वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही प्रश्न मार्गी न लागल्याने अखेर कुटुंबासह मंत्रालयाकडे पायी जाण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### प्रशासनाच्या दारात न्यायाची प्रतीक्षा!

शासनाच्या घरकुल योजनेतून घर मिळाले, मात्र त्या घरात सुरक्षितपणे राहण्यासाठीच एका गर्भवती महिलेला संघर्ष करावा लागत असल्याची बाब या घटनेतून समोर आली आहे. गर्भावस्थेत विश्रांतीची गरज असताना दोन लहान मुलांना सोबत घेऊन शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करण्याची वेळ येणे ही तिच्या व्यथेची तीव्रता दाखवणारी बाब आहे. संबंधित तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून कुटुंबाला संरक्षण द्यावे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पूजा गावडे यांनी केली आहे.दरम्यान, याप्रकरणी संबंधित ग्रामसेवक तथा विद्यमान विस्तार अधिकारी महांडुळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. तसेच पोलीस प्रशासनाची अधिकृत बाजू उपलब्ध होऊ शकली नाही.

# सगळे नाना लागले कामाला...

## दिवसभर सर्व नानांचीच चर्चा...

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : काल गुरुवारी दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या अंकात पहिल्याच पानावर 'मी आमदार होणार... तुझे भले करतो!' आमिष दाखवन 'नाना'ने १५ वर्षे शारीरिक शोषण केल्याचा माहिलेचा आरोप.. ही बातमी झळकली आणि भल्या सकाळी श्रीरामपूर शहर तालुक्यासह जिल्ह्यामध्ये तो एक चर्चे चा विषय झाला. हा नाना नेमका कोण ? असा प्रश्न जो तो विचारू लागला .संपादक करण नवले आणि इतर वार्ताहरांना देखील वाचकांनी फोन करून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला .नाना ...नानासाहेब या नावाचे सर्व नानांबद्दल वेगवेगळे तर्क वितर्क लावले जाऊ लागले .संपादक करण नवले यांना तर उत्तर देता देता नाकी नऊ आले .पण ते पण बहाद्दर हुशार ....उद्याच्या अंकात वाचा असे सांगून त्यांनी लोकांची उत्सुकता आणखी वाढवली .

याबाबतची हकीकत अशी की काल दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या अंकामध्ये 'मी राजकारणातील मोठा माणूस आहे. तालुक्याचा, जिल्ह्याचा नेता आहे. उद्या आमदार होणार; माझ्यासोबत संबंध ठेव, तुझ्याशी लग्न करून तुझे भले करतो,' असे आमिष दाखवून अहिल्यानगर जिल्ह्यातील एका बड्या राजकीय व्यक्तीने तब्बल १५ वर्षे शारीरिक शोषण केल्याचा गंभीर आरोप श्रीरामपूर तालुक्यातील एका महिलेने केला आहे. या प्रकरणी संबंधित महिलेने वरिष्ठ

#### दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या वृत्ताचा परिणाम

पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. ही बातमी प्रसिद्ध होताच अनेकांच्या भुवया उंचावल्या. श्रीरामपूर डेट लाईट असल्याने शहर व तालुक्यातील ज्या ज्या गावात नाना नावाच्या व्यक्ती आहेत त्यांची नावे चर्चेत येऊ लागली यापैकी अनेक नानांनीच संपादकांना फोन करून या वृत्ताची खातर जमा करून घेण्याचा प्रयत्न केला.पोलिसात तक्रार अर्ज दाखल झाला आहे. पोलीस तपास करत आहेत.योग्य ती शहानिशा होऊन संबंधित नानांवर गुन्हा दाखल होणार आहे असे सांगून संपादकांनी या विषयाची उत्सुकता आणखीन वाढवली.नेमका हा नाना कुठला श्रीरामपूरचा की जिल्ह्यातला याची चर्चा होऊन प्रत्येक तालुक्यातील कोण कोण नाना आहेत याची सुद्धा चाचपणी करण्यात आली.आता हा नेमका नाना कोणता आणि त्याच्यावर नेमकी काय कारवाई होणार हे लवकरच उघड होणार आहे.अहिल्यानगरसह पुणे जिल्ह्यात अत्याचार झाल्याचा दावा पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, 'नाना' या नावाने परिचित असलेल्या संबंधित राजकीय व्यक्तीने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी संबंध प्रस्थापित केले.यानंतर अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणी वेळोवेळी अत्याचार केल्याचा तिचा आरोप आहे. गर्भनिरोधक गोळ्या घेण्यास भाग पाडून शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचेही तिने तक्रारीत म्हटले आहे.ा प्रकरणाची माहिती संबंधित व्यक्तीच्या मित्रपरिवारासह कुटुंबीयांनाही होती, असा दावा महिलेने केला आहे. राहुरी तालुक्यातील दोन डॉक्टरांनीही संबंधित राजकीय व्यक्तीला मदत पोलिसांच्या भूमिकेकडे लक्ष




पंधरा वर्षांच्या कथित शोषणाचा हा गंभीर आरोप असून, तक्रारीतील दाव्यांची सत्यता तपासणे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. अद्याप तक्रारीवर गुन्हा दाखल झाला नाही. आरोप करण्यात आलेल्या संबंधित व्यक्तीची बाजूही समोर आलेली नाही. त्यामुळे तक्रारीची चौकशी करून तथ्यांच्या आधारे पुढील कारवाई होते का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. केल्याचा आरोप तिने केला आहे. इतकेच नव्हे, तर संबंधित व्यक्तीची पत्नी, मित्रमंडळी आणि पत्नीच्या नातेवाइकांकडून आपल्यावर जीवघेणे हल्ले झाल्याचा दावाही तिने केला आहे. या संबंधांमुळे आपले कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्त झाले असून, संबंधित व्यक्तीने लग्नाचे आश्वासन देऊन केवळ गैरवापर केल्याची भावना महिलेने व्यक्त केली आहे. 'माझी तक्रार कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही. माझे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे,' अशी ठाम भूमिका तिने पोलीस अधिकाऱ्यांसमोर मांडल्याचे समजते. विशेष म्हणजे, संबंधित महिलेचा राजकीय व्यक्तीच्या पत्नीसोबतही संवाद असल्याचे तिने सांगितले. एकदा दोघींनाही संबंधित व्यक्तीने तुळजाभवानीचे दर्शन घडविल्याचा दावाही तक्रारीत करण्यात आला आहे.

# चांद्यात प्रतिबंधित सुगंधी तंबाखूमिश्रित मावा साठा उघड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर** : महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी तंबाखूमिश्रित माव्याचा विक्रीच्या उद्देशाने साठा केल्याप्रकरणी सोनई पोलिसांनी चांदा येथे कारवाई केली. या प्रकरणी संबंधित विक्रेत्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातील प्रतिबंधित माव्याच्या विक्रीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

बुधवारी (दि. ४) दुपारी दोनच्या सुमारास नेवासा तालुक्यातील चांदा गावच्या शिवारात लोहारवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या सोमेश्वर पान स्टॉल येथे पोलिसांनी कारवाई केली. जयदीप कचेश्वर शेलार (वय ३३, रा. चांदा), राज कानिफनाथ दरवंडे (वय २४, रा. चांदा) आणि कैलास बऱ्हाटे (रा. घोडेगाव) यांच्याबाबत सुगंधी तंबाखूमिश्रित मावा विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे.

सुनील मुरलीधर पालवे यांच्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार दत्ता गावडे पुढील तपास करीत आहेत.

**मावा विक्रीला आळा बसणार का?**

सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक ठिकाणी प्रतिबंधित माव्याची विक्री सुरू असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. पोलिसांच्या कारवाईनंतर काही दिवस विक्री बंद राहते; मात्र पुन्हा ती सुरू होत असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागानेही नियमित तपासणी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, कारवाईनंतर संबंधित विक्रेत्यांकडून पोलिसांना आर्थिक देवाणघेवाण होत असल्याचीही परिसरात चर्चा आहे. मात्र या आरोपांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

# आदित्य ठाकरेंचे शनिदर्शन

## सोनईत गडाख कुटुंबीयांची सदिच्छा भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी शनिशिंगणापूर येथे श्री शनिदेवाचे दर्शन घेऊन विधिवत तैलाभिषेक केला. त्यानंतर सोनई येथे माजी मंत्री तथा आमदार शंकरराव गडाख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत गडाख कुटुंबीयांशी संवाद साधला. या दौऱ्यामुळे नेवासा तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

आदित्य ठाकरे यांच्या दौऱ्याची सुरुवात कुकाणा येथून झाली. येथे शिवसेनेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी मदत केंद्राचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्राच्या माध्यमातून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य केले जाणार आहे.

त्यानंतर त्यांनी शनिशिंगणापूर येथे जाऊन




शनिमूर्तीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या भेटीसाठी आणि स्वागतासाठी तरुणांसह शिवसैनिकांनी गर्दी केली होती. यानंतर सोनई येथे शंकरराव गडाख यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली. यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि आमदार सुनील शिंदे उपस्थित होते. गडाख कुटुंबीयांशी विविध सामाजिक व राजकीय विषयांवर अनौपचारिक चर्चा झाली. शंकरराव गडाख यांच्या हस्ते आदित्य ठाकरे, अंबादास दानवे आणि सुनील शिंदे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी विश्वासराव गडाख, सुनीलराव गडाख, उदयन गडाख, सुनीताताई गडाख, राजेंद्र दळवी, रामदास गोल्हार आदी उपस्थित होते. उदयन गडाख यांनी 'ऋतुरंग' दिवाळी अंक आदित्य ठाकरे यांना भेट दिला. शेतकरी मदत केंद्र, शनिदर्शन आणि गडाख कुटुंबीयांची भेट अशा विविध कार्यक्रमांनी हा दौरा लक्षवेधी ठरला.

# हिमालयात हर्बल कुंभ व धन्वंतरी महोत्सवाचा प्रारंभ

### पाच वर्षांत जगभरातील अभ्यासकांचे आकर्षण ठरेल धन्वंतरी धाम; आचार्य बालकृष्ण यांचा विश्वास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पौडी गढवाल** : हिमालयातील औषधी वनस्पती, आयुर्वेद, नैसर्गिक शेती आणि भारतीय ज्ञानपरंपरेला जागतिक ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने उत्तराखंडमधील यमकेश्वर तालुक्यातील मालाग्राम येथे तीन दिवसीय हर्बल कुंभ, जडीबुटी कृषी मेळा व धन्वंतरी महोत्सव २०२६ चा प्रारंभ झाला. सुमारे २०० एकर क्षेत्रावर विकसित होत असलेले धन्वंतरी धाम आगामी पाच वर्षांत जागतिक स्तरावरील संशोधन व अभ्यासाचे केंद्र बनेल, असा विश्वास आचार्य बालकृष्ण यांनी व्यक्त केला.

उत्तराखंडचे कॅबिनेट मंत्री डॉ. धनसिंह रावत यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. दुर्गम वनक्षेत्रात उभारण्यात




येत असलेला हा प्रकल्प निसर्ग, पर्यावरण, परंपरा आणि अध्यात्म यांचा संगम असल्याचे त्यांनी सांगितले. उत्तराखंडमधील शेतकऱ्यांना येथे चार ते पाच दिवसांचे विशेष प्रशिक्षण देण्याची तसेच विद्यापीठांतील संशोधकांना अभ्यासासाठी पाठविण्याची घोषणा त्यांनी केली. आचार्य बालकृष्ण यांनी सांगितले की, धन्वंतरी धाम हा व्यावसायिक प्रकल्प नसून आयुर्वेद आणि भारतीय ज्ञानपरंपरा जगाशी जोडण्याचा प्रयत्न आहे. येथे ५० हजारांहून अधिक औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली असून, १०९ खंडांमध्ये ५० हजारांहून अधिक वनस्पतींची औषधी माहिती संकलित केली आहे. औषधी शेतीच्या माध्यमातून पर्वतीय भागातील स्थलांतर रोखून रोजगारनिर्मिती करण्यावर भर दिला जाणार आहे.

महोत्सवात ६० ते ७० प्रदर्शन स्टॉल उभारण्यात आले असून नैसर्गिक शेती, मृदापरीक्षण, मधमाशीपालन, मशरूम उत्पादन, डिजिटल शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योगांची माहिती दिली जात आहे. यावेळी चार पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. विशेष म्हणजे, पुढील वर्षी २५ ते २७ ऑक्टोबर २०२७ दरम्यान पुन्हा हर्बल कुंभ आयोजित केला जाणार असून, यापुढे हा महोत्सव दरवर्षी होणार असल्याची घोषणा आचार्य बालकृष्ण यांनी केली.

## निधनवार्ता

### मीराबाई गाढवे



**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथील मिराबाई नीक गाढवे (वय ६४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# राष्ट्रीय शालेय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात त्रिमूर्तीच्या श्रद्धा जाधवची निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : क्रीडा क्षेत्रात मुलीही आपल्या गुणवत्तेच्या जोरावर यशाची नवनवी शिखरे सर करत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, त्रिमूर्तीनगर येथील विद्यार्थिनी तथा त्रिमूर्ती क्रिकेट अकॅडमीची उदयोन्मुख खेळाडू कु. श्रद्धा राजेंद्र जाधव हिची शालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तिच्या या निवडीमुळे त्रिमूर्तीच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, जळगाव येथे दिनांक ३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत श्रद्धा जाधव हिने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर १४ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या १७ वर्षांखालील राष्ट्रीय शालेय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात तिची निवड करण्यात आली आहे.

श्रद्धाला क्रिकेट प्रशिक्षक शैलेश दाने सर यांचे मार्गदर्शन लाभत असून, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे क्रीडा समन्वयक संभाजी निकाळजे सर यांच्यासह अभिजीत दळवी, महादेव काकडे, छबुराव काळे, अशोक पानकडे, समीर पठाण, संदीप वाघमारे, राहुल शेळके, निलेश पैठणे, अमीर शेख, गणेश शिंदे, साहेबराव दाने, विजू गायके, विकास म्हस्के, विकास गर्जे आणि बाळासाहेब गोरे यांचे सहकार्य लाभत आहे.

श्रद्धाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुमतीताई घाडगे-पाटील, उपाध्यक्षा ॲड. स्नेहल घाडगे-पाटील, सहसचिव डॉ. श्रुती आमले-पाटील, विश्वस्त चेतन चव्हाण-पाटील, संस्थेचे कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले-पाटील, प्राचार्य सोपानराव काळे, प्राचार्या दीपाली बाविस्कर, क्रीडा समन्वयक तथा आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच संभाजी निकाळजे, विभागप्रमुख संतोष राऊत यांच्यासह सर्व शिक्षक, प्रशिक्षक व अधीक्षकांनी तिचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि. ६ नोव्हेंबर २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|
| १२० ४३० ६७० | ३-४ | १५८ २४८ २२० | ३६-८४-७१-२०-४९ |

**कल्याण**

| उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|
| १९० २८० २२६ | ०-२ | १५६ १२९ ११० | ०६-३२-४८-७५-२९ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|
| १२५ २६० २३४ | ८-१ | १२८ १४६ १०० | ८६-२१-५४-९७-१० |

**माधुरी बाजार डे / नाईट**

| | | | |
|---|---|---|---|
| २६७ ३८९ ०१६० | ५-५४ | ७८० ५५४ ४७९५ | ४०- ५०-२८-२४ |

२-६-०

dpbosssss.live

## शुभ लाभ

| Date | Mon | | Tue | | Wed | | Thu | | Fri | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 | 60 | 550 | 590 | 42 | 228 | 358 | 62 | 390 | 400 | 47 | 890 | 160 | 70 | 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 | 90 | 569 | 170 | 85 | 159 | 338 | 42 | 129 | 460 | 09 | 478 | 370 | 05 | 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 | 99 | 234 | 230 | 53 | 148 | 250 | 70 | 235 | 355 | 39 | 133 | 133 | 76 | 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 | 60 | 460 | 278 | 73 | 346 | 116 | 82 | 480 | 156 | 23 | 779 | 449 | 77 | 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 | 96 | 790 | 255 | 23 | 229 | 789 | 42 | 237 | 450 | 98 | 440 | 266 | 41 | 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 | 43 | 670 | 170 | 81 | 560 | 159 | 52 | 336 | 690 | 50 | 235 | 577 | 99 | 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 | 47 | 557 | 228 | 27 | 124 | 570 | 26 | 358 | 112 | 43 | 779 | 445 | 33 | 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 | 47 | 124 | 336 | 20 | 136 | 799 | 56 | 178 | 680 | 42 | 345 | 399 | 16 | 790 |
| 21/09/2026 to 25/09/2026 | 390 | 25 | 348 | 457 | 62 | 129 | 480 | 23 | 599 | 166 | 30 | 479 | 150 | 60 | 280 |
| 28/09/2026 to 02/10/2026 | 669 | 19 | 135 | 137 | 18 | 279 | 260 | 84 | 257 | 660 | 29 | 126 | 669 | 84 | 770 |
| 05/10/2026 to 09/10/2026 | 140 | 57 | 250 | 459 | 85 | 168 | 130 | 48 | 567 | 469 | 99 | 126 | 558 | 84 | 590 |
| 12/10/2026 to 16/10/2026 | 160 | 79 | 568 | 290 | 11 | 669 | 122 | 58 | 189 | 130 | 46 | 123 | 257 | 42 | 480 |

| माधुरी बाजार डे | माधुरी बाजार नाईट |
|---|---|
| १७९ | ४६८ |
| ७७ | ८२ |
| १२४ | १५६ |

Mydpboss.com

# जनतेच्या प्रश्नांसाठी लोकसंवादाचा मंच; आ. विवेक कोल्हे यांच्याकडे ६०२ तक्रारी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, वीजपुरवठा, रस्ते आणि शासकीय योजनांतील अडचणी अशा विविध समस्यांनी त्रस्त नागरिकांनी आमदार विवेक कोल्हे यांच्या लोकसंवाद कार्यक्रमात तक्रारींचा पाऊस पाडला. तहसील कार्यालयाच्या आवारात गुरुवारी झालेल्या या उपक्रमात तब्बल ६०२ तक्रारी प्राप्त झाल्या. यामध्ये ४९३ सार्वजनिक तर १०९ वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारींचा समावेश आहे. याशिवाय १२५ हून अधिक नागरिकांनी ऐनवेळी निवेदने सादर केली.

यावेळी बोलताना कोल्हे म्हणाले, खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी अडचणीत असून पशुधन जगविण्यासाठी पाण्याची गरज आहे. त्यामुळे गोदावरी डाव्या व उजव्या कालव्यांचे आवर्तन १ डिसेंबरऐवजी १५ नोव्हेंबरपासून सोडावे. ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याच्या वेळापत्रकातही सुधारणा करावी. शासन, प्रशासन आणि जनतेने एकजुटीने दुष्काळाचा सामना करावा.

लोकसंवादात महिलांनी पीठ गिरणी देण्याचे आमिष दाखवून प्रत्येकी ५ हजार ८०० रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार केली. शेतकऱ्यांनी कालव्यांच्या दुरुस्तीतील अनियमितता, शिवरस्ते आणि पाणीवाटपाचे प्रश्न मांडले. वारी व कान्हेगावच्या गावठाणाचा प्रश्न, निराधार योजनांतील विलंब, शेतीपंपांच्या चोऱ्या, वनजमिनीवरील अवैध उत्खनन, बिबट्यांचा वाढता वावर, रेशनधान्य बंद होणे आणि शहरातील पाणीपुरवठ्याच्या समस्याही यावेळी मांडण्यात आल्या.

मोरवीस शाळेचा निधी प्रशासकीय वादामुळे परत गेल्याचा प्रश्नही उपस्थित झाला. कर्जमाफीमुळे सहकारी संस्थांवर पडलेल्या व्याजाच्या भाराबाबत जिल्हा बँकेच्या स्तरावर बैठक घेण्याचे आश्वासन कोल्हे यांनी दिले.दुपारी १२ वाजता सुरू झालेला हा लोकसंवाद सायंकाळी साडेपाच वाजता संपला. तहसीलदार महेश सावंत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व. सुमित्रा काकींनी जपलेली सामाजिक एकात्मता कायम स्मरणात राहील : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : हजारो गरजू कुटुंबांच्या मुलींच्या विवाहासाठी पुढाकार घेणाऱ्या शिरडी नगरपंचायतीच्या प्रथम महिला नगराध्यक्षा कै. सुमित्रा काकी कैलास बापू कोते पाटील यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने शिरडी शहरासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज त्यांच्या निवासस्थानी भेट दिली.यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधताना ना. विखे पाटील म्हणाले, ''स्व. सुमित्रा काकी कोते यांनी जपलेली सामाजिक एकात्मता कायम स्मरणात राहील.'' या शब्दात कृतज्ञता व्यक्त केली . गेल्या २५ वर्षांपूर्वी सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याची संकल्पना प्रत्यक्षात आणत सुमित्रा काकींनी समाजसेवेचा एक आदर्श निर्माण केला होता. जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुला-मुलींचे विवाह सन्मानाने पार पाडावेत, या उदात्त हेतूने त्यांनी हा उपक्रम सुरू केला. त्यातून हजारो मुलींचे कन्यादान करण्याचे भाग्य त्यांना लाभले. सामाजिक बांधिलकी आणि सर्वधर्म समभाव या मूल्यांना प्राधान्य देत त्यांनी उभारलेला सामुदायिक विवाह सोहळा आजही त्यांच्या कार्याची साक्ष देत आहे. त्यांच्या निधनाने समाजसेवेच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून शिर्डी ने एक सेवाभावी नेतृत्व गमावले आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.



# जिल्हा बँकेचा फक्त उत्तरेसाठी वापर करतात

## खा. नीलेश लंके, प्रताप ढाकणे, शिवाजीराव काकडे यांचा आरोप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** जिल्हा सहकारी बँकेवर विशिष्ट भागातील मोजक्या लोकांचा ताबा आहे. बँक शेतकऱ्यांची आहे असे सांगतात आणि बँकेच्या पैशाचा ठरावीक १२ कारखानदार वापर करतात. या कारखानदारांनी सर्व नियम मोडून ३ हजार कोटीचे कर्ज घेतले आणि ते थकवले आहे. जिल्हा बँकेचा फक्त उत्तरेसाठी वापर होतोय. सर्वच बाबतीत दक्षिण भागाचा केवळ वापर केला जात आहे असा आरोप खासदार निलेश लंके, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रताप ढाकणे, शिवसेना नेते ॲड. शिवाजीराव काकडे व जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हर्षदा काकडे यांनी केला. थकवलेल्या नियमबाह्य कर्जाची वसुली करा आणि मग जिल्हा बँकेचे विभाजन करा, त्याशिवाय दक्षिणेतील सामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही अशी मागणीही यावेळी ॲड. शिवाजीराव काकडे यांनी केली.

जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीनंतर बुधवार दि. ४ रोजी खासदार निलेश लंके, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रताप ढाकणे, शिवसेना नेते ॲड. शिवाजीराव काकडे व जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हर्षदा काकडे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. जिल्हा सहकारी बँकेत मी एकदा संचालक म्हणून आमच्यातून निवडून आलो असलो तरी सगळ्यांना पुरुन उरेल असे सांगत नीलेश लंके व प्रताप ढाकणे यांनी निशाना साधला. ते म्हणाले, आम्ही कोणतेही नियमबाह्य काम बँकेत होऊ देणार नाही. १२ साखर कारखानदारांनी नियमाची मोडतोड करुन २८५० कोटीचे कर्ज घेतले आहे. राहुरी कारखाना चालवायला घेतल्यावर हातउसणे पैसे घेतात तसे जिल्हा बँकेतुन ३०० कोटी रुपये घेतले. बँक शेतकऱ्याची आहे म्हणता आणि कारखानदारांना पोसण्यासाठी वाट्टेल त्या बाबी करुन सगेसोयरे बँकेत आनता. बँकेची निवडणूक यांना बिनविरोध करायचीच नव्हती, दुष्काळाचे निमित्त सागून बिनविरोधचा एक ड्रामा होता. बिनविरोध करायला आमचा विरोध नव्हता. मात्र समिती करुन एकनाथ शिंदे यांच्या वतीने दोन व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे कोणतेही दोन उमेदवार घ्या अशी आमची मागणी होती. मात्र त्यांना मुळात हे करायचेच नव्हते. आम्ही रिंगणात उतरवलो म्हणून तरी वीस वर्षानंतर जिल्ह्यातील लोकांना निवडणूक कळली. अनेकांनी तसे बोलून दाखवले आहे. चिड व्यक्त करायला लोकांना संधी मिळाली. खरे तर घेतलेल्या कर्जाचे पाप झाकण्यासाठीच दुसऱ्या कोणाला बँकेत येऊ द्यायचे नव्हते. जिल्हा बँकेतील चुकीच्या कामाला विरोधच करणार आहे.

**जिल्हा बँकेचे विभाजन करा : ॲड. काकडे**

जिल्हा सहकारी बँकेला ठरावीक कारखानदार मक्तेदारी समजून सत्ता मिळण्यासाठी सोयरेधायरे व सर्वच बाबीचा वापर करतात. यंदा आम्ही विस्थापीत लोकांसाठी निवडणूक लढवली. संगमनेर, कोपरगावात सर्वाधिक मते होती. आम्हाला तेथे कसलाही आधार नव्हता. दाबदडपशाही केली तराही आम्हाला एकून मताच्या ४५ टक्के मते मिळाली. निवडणूका लढवायला, मैदान म्हणून दक्षिणेचा वापर करतात. पण जेव्हा निधी द्यायची वेळ येते तेव्हा बँक असो की अन्य बाब सगळे पैसे उत्तरेत नेतात. विस्थापीत, सामान्य लोकांनी बँकेत येऊ नये म्हणून हे लोक प्रयत्नशील असतात. जिल्हा बँकेत दक्षिणेला कधी न्याय मिळाला नाही. त्यामुळे जिल्हा बँकेचे विभाजन केले पाहिजे अशी आमची मागणी आहे.

## गोशाळांतील पशुधनाच्या चारा-पाण्यासाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान द्या!

### दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गोशाळा महासंघ आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे गोशाळांमधील पशुधनाच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला असून, शासनाने प्रत्येक पशुसाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी गोशाळा महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्ह्यातील गोशाळा संचालक आणि पशुपालकांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. राज्यातील शासनाकडे नोंदणीकृत असलेल्या १ हजार १४ गोशाळांमधील सर्व पशुधनासाठी चारा व पाण्याच्या व्यवस्थेकरिता सरसकट अनुदान देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

राज्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने ग्रामीण भागातील पशुधनासमोर चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतांमध्ये हिरवा चारा, कडबा आणि कुटार उपलब्ध होत नसून पडीत जमिनी, डोंगराळ भाग तसेच जंगल परिसरातही अपेक्षित चारा उगवलेला नाही. परिणामी उपलब्ध चाऱ्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. दुसरीकडे शासनाकडेही पशुधनासाठी पुरेसा चारा साठा उपलब्ध नसल्याने आगामी काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. केवळ चाऱ्याचाच नव्हे, तर पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न बिकट होत आहे. विहिरी, बोअरवेल, तलाव आणि धरणांमधील पाणीसाठा कमी होत असल्याने भविष्यात गोशाळांना टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे चारा आणि पाण्याचे नियोजन आतापासूनच करणे आवश्यक असल्याचे महासंघाने निवेदनात नमूद केले आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना स्वतः चा उदरनिर्वाह करणेही कठीण झाले आहे. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेले काही शेतकरी नाइलाजाने आपल्याकडील पशुधन विक्री करीत आहेत. अशा पशुधनाची खरेदी करणारे शेतकरी नसल्याने मोठ्या प्रमाणात गोवंश कत्तलीसाठी जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत हे निवेदन पोहोचवून आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे आवाहन गोशाळा महासंघाने केले आहे. यावेळी गोशाळा महासंघाचे अध्यक्ष ललित चोरडिया, सचिव गौतम कराळे, रवींद्रनाथ महाराज, सुद्रिक मंगेश भापकर, संजय अडोळे, अनिल जोशी, प्रमिताताई ढगे, नामदेव कराळे, मुनोत आदीं उपस्थित होते.

## शहर स्वच्छता कार्यात नागरिकांचे सहकार्य अपेक्षित : सामल



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महानगरपालिका प्रशासनाकडून शहरात आरोग्य व स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. मात्र महापालिकेच्या दैनंदिन स्वच्छता कार्यामध्ये व उपक्रमांमध्ये नागरिकांचे सहकार्य व सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याचे प्रतिपादन रेल्वे स्टेशन परिसरातील स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल यांनी केले.

स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनच्यावतीने रेल्वे स्टेशन परिसरातील मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप राजेंद्र सामल यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संजीवनी कॉलनीचे जेष्ठ सदस्य उद्योजक अशोक चुडीवाल, स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनचे महावीर ललवाणी, अभय ललवाणी, ऋषिकेश ललवाणी, मुकादम योगेश वाघमारे, विजय भोसले व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अभय ललवाणी म्हणाले की, महापालिका स्वच्छता कर्मचारी दररोज शहर परिसर स्वच्छ ठेवण्याचे कार्य करीत असतात. त्यामुळे आपल्या सर्वांचे आरोग्य निरोगी राहते. दिवाळी सणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दरवर्षी स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात येते. त्यामुळे महापालिका प्रशासन व नागरिक यांच्यात समन्वय निर्माण होतो.

## तीव्र पाणीटंचाई असलेल्या भागांत तातडीने टँकर सुरू करा : नगरसेवक बारस्कर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** अल्प पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहर व उपनगरांतील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शहरातील सर्व प्रभागांमध्ये पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून ज्या भागांत तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे, त्या ठिकाणी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. तसेच उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करून पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी महापौर ज्योतीताई गाडे आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेतही नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी शहर व उपनगरांतील तीव्र पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले. पाणीटंचाईचा गांभीर्याने विचार करून नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनात म्हटले आहे की, अल्प पर्जन्यमानामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, विविध परिसरांत तीव्र पाणीटंचाईची समस्या उद्भवत आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने धरणे, तलाव आणि इतर जलस्रोतांमधील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. परिणामी, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापराच्या पाण्यासाठीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अहिल्यानगर शहरातदेखील पाणीटंचाईची समस्या गंभीर होत असून, विविध भागांतील नागरिकांकडून पुरेशा प्रमाणात आणि नियमित पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या कालावधीत पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. पाणीपुरवठा अनियमित झाल्यास सर्वसामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व प्रभागांतील पाणीपुरवठ्याचा आढावा घेऊन योग्य नियोजन करावे. ज्या भागांत पाणीटंचाई अधिक आहे, अशा परिसरांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा.

## भारतीय संस्कृतीमध्ये गाईला मातेचे स्थान : झावरे

### वसुबारसनिमित्त देवकृपा फाउंडेशनच्या वतीने चारा वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**टाकळी ढोकेश्वर :** भारतीय संस्कृतीमध्ये गाईला मातेचे स्थान असून वसुबारस हा केवळ गोपूजनाचा सण नसून मुक्या प्राण्यांप्रती कृतज्ञता आणि संवेदनशीलता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष सुजित झावरे पा.यांनी केले. यावेळी पुढे बोलताना झावरे म्हणाले की,गोशाळांमध्ये अनेक निराधार आणि मुक्या जनावरांची सेवा केली जाते. या जनावरांना चारा उपलब्ध करून देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. सण-उत्सव साजरे करताना समाजातील गरजू घटकांसोबतच मुक्या जीवांचीही काळजी घेतली पाहिजे. देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यातही अशा सेवाभावी उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

गोसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. वसुबारस या सणाचे औचित्य साधून सुजित झावरे पा. यांच्या संकल्पनेतून देवकृपा फाउंडेशनच्या वतीने शहांजापूर येथील श्री माऊली कृपा गोधाम महातीर्थ, श्रीक्षेत्र कोडेश्वर तसेच गटेवाडी येथील रामकृष्ण हरी गोशाळा येथे हा उपक्रम राबविण्यात आला. शहांजापूर व गटेवाडी येथील गोशाळेत ६५० हून अधिक गोवंश असून त्यांच्या चाऱ्याची गरज लक्षात घेऊन देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून चारा उपलब्ध करून देण्यात आला.यावेळी रामकृष्ण हरी गोशाळेचे नवनाथ महाराज गट, सुपा गावचे सरपंच योगेश रोकडे,सरपंच अण्णा मोटे,घाणेगावचे चेअरमन अनिल वाबळे, बाबा गाडेकर, शंकर साळुंके, संतोष गाडे, किशोर वाबळे,वैभव काळे,धनंजय शेलार,प्रवीण मापारी,संजय मोटे,शंकर महांडुळे,वैभव काळे,नितीन महाराज शिंदे,प्रमोद महाराज गवळी,सचिन महाराज शिंदे,नामदेव म्हस्के,डॉ.अमोल टकले,भाऊ टकले, धनंजय शेलार,संतोष मापारी,दत्तू शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## देवीभोयरे ग्रामस्थ व नेतेमंडळींचा आपल्याला कायम पाठिंबा : खा. लंके

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत संचालक होण्यासाठी तालुक्यातील जनतेने आपल्याला मोठ्या प्रमाणात पाठबळ दिले. देवीभोयरे ग्रामस्थ व नेतेमंडळी यांचे पाठबळ सर्वाधिक होते. अंबिका देवीच्या आशीर्वादाने आपण विक्रमी मताधिक्याने विजयी झालो असल्याचे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केले आहे.

देवीभोयरे ग्रामस्थ यांच्या वतीने जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल खासदार निलेश लंके यांचा अंबिका देवी मंदिरात माजी पंचायत समिती सदस्य व देवीभोयरे सोसायटी चेअरमन सुभाषराव बेलोटे यांच्या हस्ते त्यांचा शाल व अंबिका देवीचा फोटो देऊन सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी अंबिका देवी ट्रस्टचे उपाध्यक्ष संपतराव वाळुंज, माजी सरपंच अशोकराव मुळे, माजी सरपंच जयवंतराव मुळे, माजी सरपंच, विठ्ठलराव सरडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सोशल मिडिया प्रवक्ते जितेश सरडे, सोसायटीचे उपाध्यक्ष वसंतराव गायकवाड, जगदंबा पतसंस्थेचे अध्यक्ष तुकाराम बेलोटे, उपाध्यक्ष शिवाजी बेलोटे, देवीभोयरे सोसायटीचे संचालक गिताराम जाणकर, दादाभाऊ बेलोटे, मंगेशराव मुळे, बाळासाहेब बेलोटे, प्रविण मुळे, संदीप मुळे, प्रकाश मोरे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे सर्व संचालक मंडळ, जगदंबा पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खा. निलेश लंके यावेळी म्हणाले समोरील विरोधक यांनी धनशक्तीचा मोठ्या प्रमाणात वापर करून आपल्याला पाडण्याचा प्रयत्न केला मात्र या परकीयांची दहशत कायमची संपवीण्यासाठी मतदारांनी निस्वार्थीपणे आपल्याला मतदान केले यामध्ये देवीभोयरे सोसायटीचे चेअरमन सुभाषराव बेलोटे व त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वाधिक योगदान आहे.

पंचायत समितीचे माजी सदस्य व देवीभोयरे सोसायटीचे चेअरमन सुभाषराव बेलोटे यावेळी म्हणाले गेली पंधरा वर्षात खासदार निलेश लंके यांनी जनतेची निस्वार्थीपणे सेवा केली आमदार, खासदार म्हणून जिल्हा विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले. आज राज्यात त्यांचा नावलौकिक झाला आहे.

देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांचा आशीर्वाद व जनतेचे प्रेम त्यांना असल्याने जिल्हा विकासात त्यांच्या नेतृत्वाखाली अग्रेसर राहणार असल्याची खात्री बेलोटे यांनी व्यक्त केली आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोसायटीचे युवा संचालक मंगेशराव मुळे यांनी केले.

अंबिका देवस्थान ट्रस्ट उपाध्यक्ष संपतराव वाळुंज यांनी आभार मानले.

## दखल

### तरुणास लाकडी दांडक्याने व चाकुने मारहाण; गुन्हा दाखल

**अहिल्यानगर :** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कळसे वस्ती निंबळक येथे घडलेल्या पूर्ववैमनस्य व पाण्याच्या कारणावरून झालेल्या वादानंतर आरोपींनी घरात घुसून तरुणास लाकडी दांडक्याने व चाकुने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी फिर्यादी प्रमोद शरद गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी तिघा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घटनास्थळी पाणी भरण्यावरून झालेल्या वादातून आरोपींनी शिवीगाळ करून घराच्या दरवाजावर लाथा मारल्या. त्यानंतर आरोपी किशोर सुरेश जगताप, मयुरी किशोर जगताप आणि अक्षय बंडु जगताप यांनी फिर्यादी व त्यांच्या भावाला लाकडी दांडक्याने व खोऱ्याने जबर मारहाण केली. या मारहाणीमध्ये आरोपी अक्षय बंडु जगताप याने त्याच्या जवळील चाकुच्या सहाय्याने फिर्यादीच्या डाव्या हातावर, उजव्या दंडावर व बोटावर वार करून गंभीर जखमी केले. तसेच आरोपींनी फिर्यादीची मोपेड गाडी लाकडी दांडक्याने तोडून नुकसान केले आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक फौजदार सांगळे करीत आहेत.

### पूर्ववैमनस्यातून तरुणावर प्राणघातक हल्ला; लोखंडी कोयत्याने मारहाण

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरात एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत निंबळक येथील कळसे वस्ती परिसरात पूर्ववैमनस्याच्या कारणातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या प्रकरणी फिर्यादी किशोर सुरेश जगताप यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी आरोपी प्रमोद शरद गायकवाड आणि शुभम शरद गायकवाड या दोन्ही संशयितांविरुद्ध विविध कलमांन्वये कायदेशीर गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या अधिक माहितीनुसार, दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास आरोपी शुभम गायकवाड हा हातामध्ये लाकडी दांडा घेऊन आणि प्रमोद शरद गायकवाड हा हातामध्ये लोखंडी कोयता घेऊन फिर्यादीच्या घरी आले. आरोपींनी फिर्यादीला तुम्ही खूप माजले आहात असे अरेरावीत बोलून शिवीगाळ करत प्राणघातक हल्ला चढवला. यादरम्यान आरोपी प्रमोद शरद गायकवाड याने त्याच्या ताब्यातील तीक्ष्ण लोखंडी कोयत्याने फिर्यादी किशोर जगताप यांच्या डाव्या हाताच्या पंजावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच आरोपी शुभम गायकवाड याने त्याच्या हातातील लाकडी दांड्याने फिर्यादीच्या डोक्यात जोरात प्रहार करून त्यांना रक्ताच्या थोबाळ्यात पाडले. हाणामारी सुरू असताना भांडण सोडवण्यासाठी बीचमध्ये आलेले अक्षय बन्सी जगताप यांच्या हातावरही शुभम गायकवाड याने लाकडी दांड्याने मारहाण करत त्यांना दुखापत केली. यावेळी उपस्थित महिलेला आरोपींनी धक्काबुक्की करत शिवीगाळ केली आणि दमदाटी केली. तुम्ही जर पुन्हा आमच्या वाटेला आलात तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही अशी गंभीर धमकी देऊन दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदारांनी तातडीने कागदपत्रे व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस फौजदार सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस करत आहेत.

### तरुणीला जबरदस्तीने उचलून नेण्याचा प्रयत्न; पाच जणांवर गुन्हा

**अहिल्यानगर :** शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत चालला असून एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडगाव गुप्ता येथील घोडीचा माळा परिसरात शेळ्या चारत असलेल्या एका तरुणीला मोटारसायकलवरून आलेल्या पाच जणांनी बळजोरीने उचलून नेण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी तात्काळ कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. प्राप्त माहितीनुसार, पीडित तरुणी काल दुपारी साडेसहा वाजण्याच्या सुमारास संबंधित परिसरात शेळ्या चारण्याचे काम करत असताना आरोपी दोन मोटारसायकलवरून त्या ठिकाणी आले होते. आरोपींपैकी एकाने पीडितेच्या हाताला धरून चल असे म्हटले असता तिने विरोध दर्शवला, त्यानंतर सर्व आरोपींनी मिळून तिला बळजोरीने पकडले आणि उचलून नेण्यास सुरुवात केली. या दरम्यान आरोपींपैकी एकाने पीडितेची छाती दाबून तिच्या विनयभंगाची लांछनास्पद कृती केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेबाबत वडगाव गुप्ता येथील ३१ वर्षीय फिर्यादीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अनिल शकूर चव्हाण (रा. निंबळक), मत्या जनार्दन चव्हाण, सहकार जनार्दन चव्हाण, आहार जनार्दन चव्हाण (सर्व रा. पिंपळया, ता. आष्टी, जि. बीड) आणि दीपक शकूर चव्हाण (रा. निंबळक) या पाच जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, १८९(२), १९१(२), १९० नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि थोरात करीत असून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

### बोल्हेगावात दिवसाढवळ्या घरफोडी पावणेदोन लाखांचा ऐवज लंपास



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरात चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून तोफखाना पोलीस ठाणे हद्दीतील बोल्हेगाव येथील श्रीराम चौक परिसरात दिवसाढवळ्या घरफोडी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी रवींद्र बाबासाहेब ढाकणे हे आपल्या कुटुंबासह डॉक्टरकडे उपचारासाठी गेले असताना अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटाचे लॉकर तोडून सुमारे एक लाख अठ्ठ्याण्ण हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला आहे. यामध्ये सोन्याची साखळी, मंगळसूत्र, नेकलेस, झुबे, अंगठी या दागिन्यांसह अठ्ठ्याऐंशी हजार रुपयांची रोख रक्कम चोरट्यांनी पळवली आहे. ढाकणे कुटुंबीय दुपारी चार वाजता घरी परतले असता घर उघडे व साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या व फिंगरप्रिंटच्या आधारे चोरांचा शोध घेत आहेत.

## दखल

### परिवहन सेवांबाबत नागरिकांनी अभिप्राय नोंदवावा

नागरिक सर्वेक्षणात १५ नोव्हेंबरपर्यंत सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे :** प्रशासकीय सुधारणा व सार्वजनिक तक्रार विभागामार्फत (DARPG) National e-Governance Service Delivery Assessment (NeSDA) २०२५ अंतर्गत नागरिक सर्वेक्षण आयोजित करण्यात आले आहे.

या सर्वेक्षणाचा उद्देश परिवहन सेवा पोर्टलद्वारे (https://parivahan.gov.in) उपलब्ध करून देण्यात आलेल्या वाहन नोंदणी, शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करणे आणि वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती जारी करणे या सेवांचा लाभ घेतलेल्या नागरिकांकडून अभिप्राय प्राप्त करणे हा आहे.

या सर्वेक्षणाची लिंक NeSDA Way Forward पोर्टलच्या मुख्यपृष्ठावर उपलब्ध असून, नागरिकांना खालील लिंकद्वारे थेट अभिप्राय नोंदविता येणार आहे. नागरिक सर्वेक्षण लिंक : https://forms.gle/MPDGVJKPBnMKSEA सर्वेक्षणात अभिप्राय नोंदविण्याची अंतिम मुदत १५ नोव्हेंबर २०२६ आहे. त्यामुळे वाहन नोंदणी, शिकाऊ अनुज्ञप्ती तसेच वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती या सेवांचा लाभ घेतलेल्या नागरिकांनी दिलेल्या लिंकद्वारे आपला अभिप्राय नोंदवून सर्वेक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### आळंदी नगर परिषदेच्या ४२ कर्मचाऱ्यांना २१ हजारांचा दिवाळी बोनस

८ लाख ८२ हजारांची तरतूद; नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर यांची घोषणा

**आळंदी :** आळंदी नगर परिषदेच्या विविध विभागांतील ४२ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २१ हजार रुपये दिवाळी बोनस मंजूर करण्यात आला आहे. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी याबाबत घोषणा केली. बोनसपोटी नगर परिषदेने एकूण आठ लाख ८२ हजार रुपयांची तरतूद केली आहे. दिवाळीपूर्वी बोनस मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे यांनी १६ ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देण्याची मागणी केली होती. प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेत दिवाळीपूर्वीच बोनस मंजूर करून त्याचे वाटप केले.

नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, आषाढी व कार्तिकी वारीच्या काळात नगर परिषदेचे कर्मचारी २४ तास सेवेत असतात. तसेच वर्षभर शहराची स्वच्छता, पाणीपुरवठा, कचरा संकलन, विद्युत व्यवस्था, अग्निशमन अशा अत्यावश्यक नागरी सेवा सुरळीत ठेवण्यासाठी कर्मचारी प्रामाणिकपणे काम करतात. त्यांच्या कष्टाची दखल घेऊन सणासुदीच्या काळात आर्थिक दिलासा देण्याच्या उद्देशाने बोनसचा निर्णय घेण्यात आला. नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे म्हणाले, ऊन-पाऊस यांची तमा न बाळगता कर्मचारी शहराच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असतात. त्यांच्या कामाचा सन्मान व्हावा आणि त्यांना दिवाळी आनंदात साजरी करता यावी, या भावनेतून बोनसची मागणी केली होती. प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

### वारकरी विद्यार्थ्यांसमवेत राहुल चव्हाण यांनी साजरी केली दिवाळी

**आळंदी :** दिवाळीचा आनंद गरजू विद्यार्थ्यांसोबत द्विगुणित करण्याच्या उद्देशाने शिवसेनेचे आळंदी शहरप्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या वतीने श्रीरामकृष्ण आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी दिवाळी फराळ, पणत्या, उटणे तसेच पावभाजीचे वाटप करण्यात आले. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचेही आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमावेळी युवासेना जिल्हाप्रमुख धनंजय बापू पठारे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. वारकरी विद्यार्थी हे भारतीय संस्कृती आणि परंपरेचे रक्षक असून, त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्याचा आनंद अनोखा असल्याची भावना राहुल चव्हाण यांनी व्यक्त केली.

'वारकरी विद्यार्थ्यांसोबत दिवाळी साजरी करताना मनाला विशेष समाधान मिळाले. या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आणि संस्कारांना हातभार लावणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.भविष्यातही संस्थेला आवश्यक ते सहकार्य करण्याचा प्रयत्न राहील,' असे राहुल चव्हाण यांनी सांगितले.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. मोहन महाराज शिंदे यांनी आयोजकांचे आभार मानले.

# पंचवीस हजार एकरांवर चारा लागवडीचे नियोजन

## मका, कडवळ बियाण्यांचा समावेश; उर्वरित बियाण्यांचे आठवडाभरात वितरण होणार

### २२० टन बियाण्यांपैकी ८० टक्के वाटप पूर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी पुणे जिल्ह्यात २५ हजार एकर क्षेत्रावर चारा लागवडीचे नियोजन करण्यात आले असून, यासाठी मका आणि कडवळ या चारा पिकांच्या बियाण्यांचे वाटप युद्धपातळीवर सुरू आहे. महाबीज आणि राष्ट्रीय बियाणे महामंडळाकडून प्राप्त झालेल्या २२० टन बियाण्यांपैकी आतापर्यंत ८० टक्के बियाण्यांचे वाटप पूर्ण झाले आहे. उर्वरित बियाणे पुढील आठवडाभरात प्राप्त होणार असून त्याचेही पशुपालक शेतकऱ्यांना वितरण करण्यात येणार आहे.

**बियाणे वाटपाला गती; पशुपालकांपर्यंत थेट पोहोच**

चारा लागवडीसाठी मका आणि कडवळ या पिकांच्या बियाण्यांचा समावेश आहे. तालुका पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालील प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत नोंदणीकृत पशुपालक शेतकऱ्यांना बियाण्यांचे वाटप करण्यात येत आहे. उर्वरित बियाणे प्राप्त होताच त्याचेही तातडीने वितरण करण्याचे नियोजन आहे. अधिकाधिक क्षेत्रावर चारा उत्पादन घेऊन आगामी टंचाईच्या काळात पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात येत आहे.

**चारा साक्षरता अभियानातून शास्त्रीय मार्गदर्शन**

चारा लागवडीसोबतच चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि संवर्धन करण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या सहभागातून चारा साक्षरता प्रशिक्षण अभियानांतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये चाऱ्याचे नियोजन, उपलब्ध चाऱ्यापासून मुरघास निर्मिती आणि भविष्यातील टंचाईच्या काळासाठी चारा साठवणूक व संवर्धन याबाबत पशुपालकांना मार्गदर्शन केले जात आहे.

**अझोला, युरिया प्रक्रियेची प्रात्यक्षिके**

कार्यशाळांमध्ये पर्यायी चारा स्रोत म्हणून अझोला उत्पादनाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येत आहे. तसेच वाढलेल्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे आणि सकस चारा तयार करण्याचे तंत्रही समजावून सांगितले जात आहे. स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पशुपालकांचे नियमित प्रबोधन करण्यात येत आहे. या उपाययोजनांमुळे पशुधनाची उत्पादकता टिकवून ठेवण्यास मदत होणार आहे.

**टंचाईपूर्व नियोजनावर प्रशासनाचा भर**

शासनाच्या नवीन धोरणानुसार अधिकाधिक चारा उत्पादनावर लक्ष केंद्रित करून जिल्ह्यात उपाययोजना राबविण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजेश कुमार वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली बियाणे वितरण, चारा लागवड, चारा संवर्धन आणि पशुपालक प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. संभाव्य टंचाईच्या काळात पशुधनाला पुरेसा व सकस चारा उपलब्ध व्हावा, यासाठी प्रशासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य दिले जात आहे.

## मलठणमध्ये सशस्त्र दरोड्याने खळबळ !

मध्यरात्री वृद्ध दाम्पत्यावर लोखंडी रॉडने हल्ला; सोन्याचे दागिने ओरबाडून दरोडेखोर पसार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील मलठण येथे मध्यरात्री ७ ते ८ जणांच्या सशस्त्र दरोडेखोरांच्या टोळीने घरात घुसून वृद्ध दाम्पत्यावर लोखंडी रॉडने बेदम मारहाण करत सोन्याचे दागिने लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे म लठणसह संपूर्ण बेट भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार (दि. २ नोव्हेंबर) रोजी मध्यरात्री सुमारे एक वाजण्याच्या सुम ारास मलठण-शिक्रापूर रस्त्यावरील एकनाथ दंडवते यांच्या घरात ७ ते ८ जणांच्या टोळीने प्रवेश केला. गाढ झोपेत असलेल्या एकनाथ दंडवते आणि त्यांच्या ८० वर्षीय पत्नी यमुनाबाई दंडवते यांच्यावर दरोडेखोरांनी अचानक हल्ला चढवला. दोघांनाही लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. टाकळी हाजी पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक गोविंद खटिंग आणि सहायक फौजदार राजेंद्र चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

**वृद्ध दाम्पत्याच्या घरात घुसून सशस्त्र हल्ला; नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!**

टाकळी हाजी पोलीस चौकीच्या हद्दीत यापूर्वीही विद्युत रोहित्र, मोटारी, केबल, दुचाकी चोरी, घरफोडी तसेच महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावण्याच्या घटना घडल्या आहेत. आता थेट घरात घुसून वृद्ध दाम्पत्यावर हल्ला करून दरोडा टाकण्यापर्यंत गुन्हेगारांची मजल गेल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

गंभीर गुन्ह्यांमधील आरोपींना तातडीने अटक करून परिसरात पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या सशस्त्र दरोड्यातील आरोपींचा शोध घेऊन त्यांना लवकरात लवकर जेरबंद करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

## शेतरस्ता प्रश्नांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारा! : शरद पवळे

राज्य सरकारला तीन महिन्यांचा अल्टिमेटम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** महाराष्ट्रातील शिवरस्ते, पाणंद रस्ते आणि शेतशिवार रस्त्यांचे सर्वेक्षण, सीमांकन करून अतिक्रमणमुक्त करावेत, तसेच न्यायालयीन शेतरस्ता प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र 'शिवपाणंद शेतरस्ता कक्ष' स्थापन करावा, अशी आक्रमक मागणी महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद भाऊसाहेब पवळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात २९ कलमी सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. राज्यातील प्रलंबित शेतरस्ता प्रकरणे निकाली काढण्यासाठी 'मिशन झिरो पेंडन्सी', आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे अचूक मोजणी, कायमस्वरूपी हद्दखुणा, अतिक्रमणमुक्त रस्ते, सातबारा उताऱ्यावर नोंदी आणि पात्र रस्त्यांचे काँक्रीटीकरण व डांबरीकरण अशा महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.



शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी रस्ता मिळणे हा त्यांच्या हक्काचा आणि आर्थिक स्वावलंबनाचा प्रश्न आहे. त्यामुळे स्वतंत्र नोडल अधिकारी नेमून मंत्रालयीन स्तरावर प्रभावी यंत्रणा उभारावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.तीन महिन्यांत ठोस निर्णय घेऊन कृती आराखड्याची अंमलबजावणी सुरू करावी; अन्यथा राज्यातील शेतकऱ्यांना संघटित करून राज्यव्यापी 'चले जाव' आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शरद पवळे यांनी राज्यमंत्री योगेश कदम यांचे खाजगी सचिव तानाजी सरावणे यांच्याकडे निवेदन सादर करताना दिला.

### शिरूरमध्ये घातक हत्यारांसह फिरणारे दोन तरुण पोलिसांच्या जाळ्यात!

कोयता, स्क्रूड्रायव्हर आणि मोटारसायकलसह ५० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूर शहरात रात्रीच्या वेळी घातक हत्यारे घेऊन संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोन तरुणांना शिरूर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी लोखंडी कोयता, स्क्रूड्रायव्हर आणि मोटारसायकल असा एकूण ५० हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास रामलिंग रोड ते नवीन शिरूर नगरपरिषदेकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्याच्या बाजूला हार्द हॉस्पिटलजवळ अंधारात दोन तरुण संशयास्पदरीत्या फिरताना पोलिसांना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे एक लोखंडी कोयता आणि एक स्क्रू ड्रायव्हर आढळून आला. तसेच त्यांच्याकडील हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकलही जप्त करण्यात आली.या कारवाईत राज रेखा आंधारे (वय २१, रा. शेळकेवस्ती, रांजणगाव) आणि सुजर संतोष उघडे (वय १९, रा. मोडकाई वस्ती, रांजणगाव गणपती, ता. शिरूर) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले.पोलिसांनी त्यांच्याकडून ३०० रुपये किमतीचा लोखंडी कोयता, १०० रुपये किमतीचा हिरव्या रंगाच्या मुठीचा स्क्रूड्रायव्हर आणि ५० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्रमांक चक-४५-अइ-२७४९) असा एकूण ५० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार मोरे करीत आहेत. रात्रीच्या वेळी घातक हत्यारे घेऊन फिरणाऱ्या तरुणांवरील या कारवाईमुळे शिरूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शिरूर पोलिसांच्या सतर्कतेचे दर्शन घडले आहे.

## टाकळी हाजी दूरक्षेत्रात कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची गरज!

चोरी, घरफोडीच्या घटनांत वाढ; १९ गावांच्या सुरक्षेसाठी सक्षम नेतृत्वाची अपेक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील १९ गावांच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या टाकळी हाजी पोलीस दूरक्षेत्रात सक्षम आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. परिसरात वाढत्या चोऱ्या, घरफोडी, विनयभंग, मंदिरांमधील दानपेट्या फोडण्याच्या घटना तसेच मोबाईल चोरीच्या प्रकारांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

टाकळी हाजी पोलीस दूरक्षेत्राच्या हद्दीत अनेक मोठ्या गावांचा समावेश असून हा परिसर भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण आहे. या भागात शेतकऱ्यांची वर्दळ, औद्योगिक क्षेत्र, धार्मिक स्थळे तसेच बाजारपेठा असल्याने नागरिकांची सतत ये-जा असते. मात्र, अनेक गुन्हे अद्याप उघडकीस येत नसल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.या परिसरात रात्रीची प्रभावी गस्त वाढविणे, संशयितांवर नजर ठेवणे, अडथळे व चौकशी नाकाबंदी करणे तसेच प्रलंबित गुन्ह्यांचा विशेष आढावा घेणे आवश्यक आहे. चोरीचे गुन्हे उघडकीस आणून चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी सक्षम नेतृत्वाखाली ठोस नियोजनाची गरज आहे. १९ गावांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर! १९ गावांतील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता पोलीस प्रशासनाने टाकळी हाजी दूरक्षेत्रात सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या भागातील नागरिकांना केवळ आश्वासन नको, तर प्रत्यक्ष कृतीतून सुरक्षिततेची हमी हवी आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन टाकळी हाजी दूरक्षेत्राला कर्तव्यदक्ष व अनुभवी अधिकारी द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




# लोकाभिमुख प्रशासनासाठी तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष क्षेत्रभेटींवर भर द्यावा : मुख्य सचिव राजेश अग्रवाल

## 'विकसित महाराष्ट्र २०३०' आणि शाश्वत विकास ध्येयांच्या पूर्ततेसाठी अधिकाऱ्यांना आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** विकसित महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रशासनाने अधिकाधिक लोकाभिमुख दृष्टिकोन स्वीकारावा. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक व परिणामकारक करावे. त्याचबरोबर प्रत्यक्ष क्षेत्रभेटी, कामांची पाहणी आणि नागरिकांशी थेट संवाद यावर अधिकाऱ्यांनी भर द्यावा, असे आवाहन राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.

यशदा येथे राज्यातील पाच ते सहा वर्षांचा प्रशासकीय सेवेचा अनुभव असलेल्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आणि जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांसाठी आयोजित 'गव्हर्नन्स २०३०' या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी संपूर्ण दिवसभर कार्यशाळेत उपस्थित राहून अधिकाऱ्यांशी संवाद साधला. प्रशासनाच्या कामकाजाचा अंतिम लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे असल्याचे नमूद करून त्यांनी अधिकाऱ्यांनी नियमित क्षेत्रीय दौरे करावेत, विकासकामांना प्रत्यक्ष भेटी देऊन कामांच्या गुणवत्तेची पाहणी करावी आणि



शासकीय योजनांची अंमलबजावणी नागरिकांच्या दृष्टीने किती परिणामकारक ठरत आहे, याचा आढावा घ्यावा, असे सांगितले. जिल्हा नियोजन अधिकारी यांना गावात जावे. तेथील स्थिती पहावी जेणे करून याची जिल्हा नियोजनात मदत होईल असेही यावेळी त्यांनी नमुद केले.

तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभव यांची सांगड घालून प्रशासन अधिक संवेदनशील, कार्यक्षम आणि लोककेंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

कार्यशाळेच्या प्रारंभी विकसित महाराष्ट्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी राधा कुलकर्णी यांनी विकसित महाराष्ट्राचे व्हिजन, त्यातील प्राधान्याची क्षेत्रे आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासनाची भूमिका व जबाबदाऱ्या याबाबत मार्गदर्शन केले.


मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने राज्याची देशपातळीवरील कामगिरी अधिक उंचावण्यासाठी जिल्हास्तरावर करावयाचे नियोजन, प्राधान्यक्रम आणि प्रभावी अंमलबजावणी याबाबत सविस्तर विवेचन केले. नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देताना त्यांनी नीती आयोगाने निवडलेल्या २७ तालुक्यांव्यतिरिक्त राज्य शासनाने आणखी १५० तालुक्यांची निवड केली असून, अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमातील विविध निर्देशक, त्यांचे महत्त्व, प्रगतीचे मोजमाप आणि नियमित आढावा घेण्याच्या पद्धतीबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. यासाठी विकसित करण्यात येत असलेल्या स्वतंत्र पोर्टलची माहितीही यावेळी देण्यात आली.

ॲक्सिस माय इंडियाचे प्रदीप गुप्ता यांनी क्षेत्रीय स्तरावर वस्तुनिष्ठ माहिती संकलित करणे, नागरिकांच्या अनुभवांच्या आधारे योजनांचे मूल्यमापन करणे आणि प्रत्यक्ष परिणामांचा अभ्यास करण्याच्या पद्धतींबाबत सादरीकरण केले.

यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. उपम हासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी आभार मानले. सहायक प्राध्यापक सीमा जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

## मोशी कचरा डेपोविरोधातील जनआंदोलनाला खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा जाहीर पाठिंबा!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कवठे येमाई :** मोशी (पुणे) येथील कचरा डेपोच्या गंभीर समस्येविरोधात सुरू असलेल्या जनआंदोलनाला शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल रामसिंग कोल्हे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी प्रशासनाला निवेदन देऊन आंदोलनातील नागरिकांच्या मागण्यांना समर्थन दर्शविले आहे.

मोशी कचरा डेपोमुळे होणारे प्रदूषण, दुर्गंधी, दूषित पाण्याचा इंद्रायणी नदीवरील परिणाम आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.कचरा डेपोच्या समस्येवर कायम स्वरूपी उपाययोजना कराव्यात, दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी तसेच कचरा डेपोचे योग्य नियोजन करावे,अशा प्रमुख मागण्या त्यांनी मांडल्या आहेत.नागरिकांच्या आरोग्य, पर्यावरण आणि न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या मोशी जनआंदोलनाला खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिलेला जाहीर पाठिंबा आंदोलनाला महत्त्वपूर्ण बळ देणारा ठरला आहे.

## द•ख•ल

### बहुजन समाज पार्टीच्या संघटनात्मक बांधणीसाठी राशीन येथे महत्त्वपूर्ण बैठक

**राशीन :** बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रभारी रामचंद्र जाधव यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान राशीन येथे भेट देत पत्रकार परिषद व पक्षाच्या संघटनात्मक आढावा बैठकीचे आयोजन केले. यावेळी जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करणे, नवीन जिल्हा कार्यकारिणी, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढविण्याची तयारी तसेच युवक व तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी देण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी बहुजन समाज पार्टीचे अहिल्यानगर जिल्हा प्रभारी दत्तात्रय आत्माराम सोनवणे यांचा राशीन येथील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना फेटा बांधून सन्मानित करण्यात आले. या बैठकीस अजय केदळे, आनंद कांबळे, सर्फराज मुंडे, संतोष गवळी, गणेश डाडर, विकास साळवे, बाळासाहेब दामोदरे, बॉबी कांबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### निघोज सोसायटीच्या चेअरमनपदी लोखंडे



**निघोज :** निघोज सोसायटीच्या चेअरमनपदी अंकुश सुदाम लोखंडे यांची गुरुवार दि.५ नोव्हेंबर रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक निबंधक विशाल दाते होते. यावेळी लोखंडे यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, सहसचिव विश्वास शेटे, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, संचालक दत्तात्रय लंके व वसंत ढवण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संचालक मंडळाच्या बैठकीस माजी चेअरमन सुनिल वराळ, व्हा.चेअरमन हिरामण सोनवणे, शिवाजीराव लंके, रामदास रसाळ, संतोष लामखडे, शांताराम कवाद, असिमभाई हावलदार, मंदा अशोक ढवळे, तज्ञ संचालक किसन वरखडे, सचिव रामदास भोसले आदी उपस्थित होते. सुनिल वराळ यांना साडेचार वर्षे चेअरमन पदाची संधी मिळाली. निवडणुकीला सहा महिने अवधी असला तरी दुष्काळी परिस्थितीमुळे निवडणूक पुढे जाणार असल्याने लोखंडे यांना एक वर्षापेक्षा जास्त दिवस संधी मिळण्याची शक्यता आहे. नुतन चेअरमन अंकुश लोखंडे यांनी यावेळी सांगितले की जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीत खासदार निलेश लंके निवडून आल्याने व त्यांचे निघोज गावावर विशेष प्रेम असल्याने निघोज सोसायटी माध्यमातून सभासद शेतकऱ्यांना जिल्हा सहकारी बँकेच्या योजनांचा लाभ सर्वाधिक होणार आहे. खासदार लंके तसेच निघोज ग्रामीण पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद सर,माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली तसेच संचालक मंडळ व शेतकरी सभासद यांच्या सहकार्याने सोसायटीचा कारभार आतिषय कार्यक्षमपणे करणार असल्याची ग्वाही लोखंडे यांनी दिली आहे.

### दीपावलीच्या शुभमुहूर्तावर नगर तहसीलमध्ये 'लोकअदालत'

**चिचोंडी पाटील :** दिवाळीच्या सणाची लगबग सुरू असतानाच वसुबारसच्या दिवशी नगर तहसील कार्यालयात 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान' राबविण्यात आले. या अभियानाच्या निमित्ताने तहसील कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घरातील सणासुदीची कामे आणि इतर व्याप बाजूला ठेवून अनेक नागरिकांनी आपल्या जमिनीशी संबंधित महसुली प्रश्न मार्गी लावण्यासाठी तहसील कार्यालयात धाव घेतली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने हे अभियान १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राज्यभर राबविण्यात येत आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले शेतजमीन, फेरफार, शेतरस्ते तसेच जमिनीशी आणि रस्त्यांच्या हक्कांशी संबंधित इतर महसुली वाद तडजोडीने आणि जलद गतीने निकाली काढणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. नगर तहसील कार्यालयात वसुबारसच्या दिवशी झालेली नागरिकांची गर्दी लक्षवेधी ठरली. दिवाळीचा सण जवळ आलेला असतानाही अनेक नागरिकांनी आपली इतर कामे बाजूला ठेवून महसुली प्रश्नांसाठी तहसील कार्यालयात उपस्थिती लावली. यावरून जमिनीचे वाद, फेरफार नोंदी आणि शेतरस्त्यांसारखे प्रश्न नागरिकांसाठी किती महत्त्वाचे आहेत, हे अधोरेखित झाले. महसुली प्रकरणांचा निपटारा सुलभ आणि जलद व्हावा, नागरिकांना वारंवार कार्यालयात चकरा माराव्या लागू नयेत आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वादांना तडजोडीच्या माध्यमातून मार्ग मिळावा, या उद्देशाने राज्यभर हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना आपल्या प्रलंबित महसुली प्रश्नांबाबत दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### वृक्षभेटीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**नगर तालुका :** सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रात निस्वार्थपणे योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना नाशिक येथे चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त प्रदान करण्यात आलेल्या 'सन्मान कलावंतांचा' पुरस्काराने गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना वृक्ष भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत शिक्षकांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक उत्तम कांडेकर आणि ज्येष्ठ शिक्षिका मंदा साळवे यांच्या हस्ते पै. नाना डोंगरे यांचा वृक्ष देऊन सन्मान केला. यावेळी कचरू कापसे, आप्पासाहेब कदम, शरद भोस, स्वाती इथापे, सुप्रिया ठुबे, तेजस केदारी, रत्नमाला थोरात, मोहिनी धर्माधिकारी, पल्लवी खरात, दिपाली शिरसाठ, दिपाली ठाणगे, निकिता शिंदे, रेखा जरे, तुकाराम पवार, प्रमोद थिटे, राम जाधव, बाळासाहेब कोतकर, आनंद ग्यानाप्पा, लहानू जाधव आदी शिक्षक उपस्थित होते. कलावंत विचार मंच, नाशिक आणि कमल फिल्म प्रोडक्शन, कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात पै. नाना डोंगरे यांना नुकताच 'सन्मान कलावंतांचा' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा गौरव करण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल नवनाथ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे आणि सचिव सुमन कुरेल यांनीही पै. नाना डोंगरे यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आगामी काळात जागतिक स्तरावरील गरजूंना भारतीय नोकऱ्यांचे आकर्षण वाढेल : सतीश गुगळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**पाथर्डी :** जागतिक पातळीवर सर्व क्षेत्रांमध्ये बदलाचा वेग सध्या खूप वाढला आहे. जग झपाट्याने बदलत असून ज्ञान व माहितीची प्रत्येकाची भूक वाढली आहे. भारतीय तरुणांना सध्या परदेशी नोकरीचे आकर्षण आहे. भविष्यात अशी वेळ येईल की, जगातील गरजूंना भारतीय नोकऱ्यांचे वेड लागेल, असे मत श्रीतीलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे यांनी व्यक्त केले.

शैक्षणिक व सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमांतर्गत विविध देशातील विद्यार्थी गेल्या सात वर्षांपासून श्री तीलोक जैन विद्यालयात अभ्यास दौऱ्यासाठी येतात. यावर्षी मेक्सिको येथील विद्यापीठाचे तीन विद्यार्थी, दोन विद्यार्थिनी, व एक शिक्षिका असे सहा जणांची शिष्टमंडळ दाखल झाले आहे. या विद्यार्थ्यांचा शानदार स्वागत सोहळा विद्यालयाच्या पटांगणावर संपन्न झाला. यावेळी मेक्सिकोचे विद्यार्थी रेनाटा व लन यांचे अस्सल महाराष्ट्रीयन पद्धतीने स्वागत झाल्याने त्यांच्यासह स्थानिक विद्यार्थी सुद्धा भारावून गेले.

प्राचार्य अजय भंडारी, उपप्राचार्य भारत गाडेकर, पर्यवेक्षक बाळासाहेब गांगुर्डे, सुधाकर सातपुते, इंग्लिश स्कूलचे प्राचार्य विजय तागड, संस्थेचे पदाधिकारी डॉ. ललित गुगळे, सुरेश कुचेरिया, राजेंद्र मुथा, प्रीतम बाबर, सुरज बाबर आदि प्रमुख मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

जैन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेक्सिको विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांबरोबर रसायनशास्त्र व पर्यावरण संबंधीच्या विषयावर अभ्यास करत संयुक्त प्रकल्प तयार केले. येथे या प्रकल्पांचे सादरीकरण सुद्धा होणार आहे. एकूण पाच दिवसांचा शैक्षणिक दौरा असून यादरम्यान त्यांचे प्रमुख देवस्थानांना भेट, ऐतिहासिक व नैसर्गिक क्षेत्रांचा अभ्यास, कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास, दैनंदिन आहार व जीवनशैलीचे सुद्धा अवलोकन मेक्सिकोच्या विद्यार्थ्यांकडून होणार आहे.

यावेळी बोलताना डॉ. ललित गुगळे म्हणाले, भारताचे आठ हजार नागरिक मेक्सिकोमध्ये उद्योग व्यवसायात कार्यरत आहेत. मिरची, बटाटे, गहू या पदार्थांची भारताला याच देशाकडून देणगी मिळून तीच परंपरा पुढे चालली. आज आपल्याला ही पिके भारतीय वाटतात, पण याचे मूळ मेक्सिकन आहे. अन्न संस्कृती सुद्धा बऱ्याच अंशी भारतासारखीच आहे. दोन्ही देशांमधील विद्यार्थी संशोधन अभ्यास व नाविन्याचा शोध संयुक्तपणे घेत काही नवीन मुद्दे शोधत आहेत. सांस्कृतिक, शैक्षणिक व भावनिक जवळीक दोन्ही देशांसाठी प्रगतीची नवी दालने खुली करू शकते. भारतीय विद्यार्थ्यां कडून वैश्विक स्तरावर देशाची प्रतिमा व बुद्ध्यांक उंचावण्यासाठी जागतिक पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्नांना असे कार्यक्रम पूरक ठरतात.,

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य समन्वयक प्रा. डॉ. श्रीकांत काळोखे, सूत्रसंचालन सुनील कटारिया, वेदिका देवढे व अक्षया गुंजाळ यांनी केले. अनिल पानखडे यांनी आभार मानले.

मुख्य स्वागत समारंभ नंतर विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाला सुद्धा प्रमुख पाहुण्यां सह विद्यार्थी व मान्यवरांनी भरभरून प्रतिसाद दिला.

## साकळाई उपसा सिंचन योजनेचे काम सुरू करा!



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** : जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेला राज्य सरकारने मंजुरी देऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप योजनेच्या कामाचे भूमिपूजन झालेले नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत भूमिपूजन करण्याचे जाहीर केले होते. त्यामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार तातडीने भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. तसेच दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी व पशुपालकांना दिलासा देण्यासाठी चारा छावण्या, चारा डेपो सुरू करावेत किंवा पशुधन वाचविण्यासाठी तातडीने अनुदान जाहीर करावे, अशी मागणी साकळाई योजना कृती समितीने केली आहे. या मागण्यांसाठी गुरुवार रोजी ता. नगर येथे जनआंदोलन आणि रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## नगरमध्ये ६ नोव्हेंबरला रणशिंग फुंकणार!

**अहिल्यानगर :** सत्तेच्या माजात धुंद झालेल्या आणि लाल दिव्यांच्या गाड्यांमध्ये घोरणाऱ्या सुस्त प्रशासनाला सळो की पळो करून सोडण्यासाठी अहिल्यानगरची धूळ उडणार आहे! जगभर दीपोत्सवाचा उत्सव सुरू असताना, दुसरीकडे 'पीपल्स हेल्पलाईन' आणि 'भारतीय जनसंसद' या संघटनांच्या वतीने व्यवस्थेच्या छाताडावर पाय ठेवत आक्रमक आणि बंडखोरीची हाक देणारा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी अहिल्यानगरच्या हुतात्मा स्मारकात, देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यासह शासन-प्रशासनातील तमाम पदाधिकाऱ्यांना ज्येष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कर्तव्यनिष्ठेच्या नखाची प्रतिकृती प्रतीकात्मक 'दिवाळी भेट' म्हणून जाहीरपणे सुपूर्द केली जाणार आहे.

## सेवानिवृत्तानी सामाजिक क्षेत्रात योगदान द्यावे : रोहोकले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**टाकळी ढोकेश्वर :** सेवानिवृत्तीनंतर जीवनातील दुसरे पर्व सुरु होते या दुसऱ्या पर्वात सेवानिवृत्तानी सामाजिक क्षेत्रात योगदान द्यावे असे प्रतिपादन शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले यांनी केले.

बिरेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत श्रीम.शैला सुखदेव दुधाडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला यावेळी रावसाहेब रोहोकले अध्यक्षपदावरून बोलत होते.

यावेळी प्राथमिक शाळा बिरेवाडी,बिरेवाडी ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती,विविध संस्था यांच्या वतीने श्रीमती शैला दुधाडे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संगमनेर तालुका भाजपा अध्यक्ष गुलाबराजे भोसले,पांडूरंग पा.सागर, शा.व्य.समितीचे अध्यक्ष दत्तात्रय ढेंबरे,उपाध्यक्ष किसन भोसले,सरपंच शितल ढेंबरे,ग्रा. सदस्य पंढरीनाथ भाऊ ढेंबरे,शंकर भोसले,विलास भोसले, अमोल गळंगे,नवनाथ ढेंबरे,अण्णा ढेंबरे,शिक्षक नेते बापूसाहेब तांबे,प्रवीण ठुबे, प्राथमिक शिक्षक बँक अध्यक्ष सरस्वती घुले, संचालक राजू राहणे,विनायक भोसले,सुनिल दुधाडे, ॲड रघुनाथ खिलारी,सुखदेव दुधाडे,शिवाजी कानवडे, पंकज कवडे,राजू कुदनर वैभव पठारे,संजय शेंडगे, सुरेश निवडुंगे,श्रीम.जया औटी,ज्ञानेश्वर हारदे, प्रल्हाद भालेकर,किसन खेमनर नंदा वलवे,कारभारी बाबर, अंबादास झावरे,पो.मा. झावरे,पत्रकार बबनराव गायके, प्रकाश इघे,अमोल उगले,गणेश जगदाळे,संतोष दाते, रवि झावरे,दादाभाऊ रोकडे,सुदाम दाते,संतोष खामकर आदी तसेच प्राथमिक शिक्षक संघटना प्रतिनिधी व शिक्षक उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक सतीश रोकडे यांनी केले. सूत्रसंचालन विजय वाळुंज यांनी केले.तसेच बिरेवाडी शाळेतील शिक्षक भांड,पवार वेडे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले.

## पारनेर मधे लोकशाही व संविधानच्या सन्मानार्थ महामोर्चा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** जगात सर्वात मोठी लोकशाही भारत देशाची आहे.परंतु गेल्या काही वर्षांतील देशाची परिस्थिती पाहता सरकारने लोकशाही, संविधान आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार धोक्यात आणले आहेत. लोकशाहीमधे सत्तेची चावी ही सर्वसामान्य जनतेच्या हातात असते, त्यासाठी त्यांना संविधानाद्वारे सर्वोच्च अधिकार बहाल करण्यात येतो तो म्हणजे *मताधिकार* होय. परंतु सरकारच्या गलथान कारभारामुळे अलीकडे सर्वसामान्य जनतेचा मौलिक मुलभूत मताधिकार धोक्यात आला आहे.

मतदान प्रक्रियेत शासनाने ईव्हीएम मशिनचा वापर सुरु केल्यामुळे देशातील निवडणूका मुक्त, निपक्षपाती आणि पारदर्शक होत नाहीत. त्यातच सरकारने 'स्पेशल इंटेसिव्ह रिविझन' या नवीन मतदार संशोधन प्रक्रियेद्वारे देशातील १३ कोटी ३० लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळून त्यांना मताधिकारापासुन वंचित केले आहे. ही एकप्रकारे लोकशाहीची हत्याच आहे.

सरकारच्या अशा अनेक संविधान विरोधी धोरणांमुळे देशात महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, महिला अत्याचार, शेतकरी आत्महत्या, पेपर फुटी, विद्यार्थी आत्महत्या, अनागोंदी व अस्थिरता अशा भयंकर समस्यांनी थैमान घातले आहे. ज्यामुळे सर्वसामान्य नागरिक भयभीत झाला आहे. सरकार द्वारे नागरिकांच्या मुलभूत अधिकारांची गळचेपी होत असून संविधानाची पायमल्ली केली जात आहे. त्यामुळेच लोकशाही व संविधानाच्या सन्मानार्थ आणि नागरिकांच्या मुलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी आणि विविध जनहितार्थ मागण्यांसाठी गुरुवार रोजी पारनेर तहसील कार्यालयावर महामोर्चा आयोजित केला आहे.

## श्रीगोंद्यात चोरट्यांचे राज्य!

## महिनाभरात १० चोरीचे गुन्हे; ९ गुन्ह्यांची उकलच नाही!२१ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल लंपास

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, नागरिकांच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाहनचोरी, दुकानफोडी, घरफोडी, सोन्याचे दागिने हिसकावणे, वृद्धांना पोलीस असल्याचे भासवून लुटणे, शेतातील विद्युत रोहित्र आणि सोलर पंप चोरी अशा विविध घटनांनी तालुका हादरला आहे. ३० सप्टेंबर ते १ नोव्हेंबर या अवघ्या महिनाभरात चोरीचे तब्बल १० गुन्हे दाखल झाले असून, त्यामध्ये २१ लाख ५८ हजार १९६ रुपयांचा मुद्देमाल लंपास झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे या दहा गुन्ह्यांपैकी केवळ सिगारेट चोरीच्या गुन्ह्याची उकल झाली असून, उर्वरित नऊ गुन्ह्यांचा तपास अद्याप लागलेला नाही. त्यामुळे श्रीगोंद्यात चोरट्यांना पोलिसांचा धाक उरला आहे की काय, असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

**१० गुन्हे, एकाची उकल; नऊ गुन्ह्यांचे काय?**

२१ लाखांचा ऐवज लंपास; श्रीगोंद्यात चोरट्यांचा धुमाकूळ, पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान! गुंन्हे दाखल होणे ही पोलिसांची नोंद; पण गुन्ह्यांची उकल होणे ही नागरिकांच्या सुरक्षिततेची खरी कसोटी!

तालुक्यातील चोरीच्या घटनांची व्याप्ती आता घर, दुकान आणि वाहनांपुरती मर्यादित राहिलेली नाही. चोरट्यांनी थेट शेतकऱ्यांच्या विद्युत रोहित्रांवर आणि सोलर पंपांवर हात साफ करण्यास सुरुवात केली आहे. काष्टी, घोडेगाव, होलेवाडी, मांडवगण, औटेवाडी, मयुरेवाडी आणि श्रीगोंदा शहर परिसरात चोरीच्या घटना घडल्या आहेत. विशेष म्हणजे, ७५ वर्षीय वृद्धाला पोलीस असल्याचे भासवून त्याच्या हातातील सोन्याची अंगठी काढून घेण्यात आली. तर रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावण्यापर्यंत चोरट्यांची मजल गेली आहे. बंद अपार्टमेंटमधील घरफोडीत तिजोरी फोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कमही लंपास करण्यात आली. या घटनांमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चोरीच्या घटनांची आकडेवारी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे करणारी आहे. महिनाभरात दहा गुन्हे दाखल होऊनही केवळ सिगारेट चोरीच्या गुन्ह्याचा छडा लागला आहे. उर्वरित नऊ गुन्ह्यांतील चोरटे अद्याप मोकाट असल्याने पोलिसांच्या तपास यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चोरी गेलेला मुद्देमाल हस्तगत होणार का, संशयित टोळ्यांचा शोध लागणार का आणि नागरिकांना सुरक्षिततेची हमी मिळणार तरी कधी, असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

श्रीगोंदा शहरासह ग्रामीण भागात रात्रीची प्रभावी गस्त, संशयितांवर लक्ष, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि चोरीच्या गुन्ह्यांचा तातडीने छडा लावण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मॅक्स उद्योग समूहाचा ६०० गरजू कुटुंबांना मदतीचा हात

## युवा फाऊंडेशनच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर कुटुंबांना दिवाळी किटचे वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**निघोज :** ढवळपुरी ता. पारनेर दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि आपुलकीचा सण! मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसमोर सण साजरा करण्याचेही मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा कठीण परिस्थितीत समाजातील गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचे काम मॅक्स उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सचिन नरवडे व युवा उद्योजक इंजि. प्रवीण फलके यांनी केले आहे. त्यांच्या पुढाकारातून युवा फाऊंडेशन ढवळपुरी यांच्या सहकार्याने गावातील तब्बल ६०० गरजू, दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना दिवाळी किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचे दर्शन घडले.

दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात आनंदाचा दिवा लागावा, प्रत्येक कुटुंबाच्या चेहऱ्यावर समाधान दिसावे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणाचेही सणाचे आनंदाचे क्षण हिरावले जाऊ नयेत, या उदात्त हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विशेषतः दुष्काळामुळे शेती व्यवसाय अडचणीत आला असून शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत त्यांना दिवाळीच्या काळात मदतीचा हात देत ६०० कुटुंबांपर्यंत दिवाळी किट पोहोचविण्यात आले.

या कार्यक्रमाला सचिन नरवडे, इंजि. प्रवीण फलके, बबन पवार, अमोल ठाणगे, होणाभाऊ घोगरे, संतोष गोयकर, देविदास फलके, बबन राठोड, नंदू गावडे, इंजि. वसंत चितळकर, नंदू वाघ, संतोष थोरात, विश्वनाथ वाघ, गणेश पारखे, बाबाजी चौधरी, दादाभाऊ व्यवहारे, आसिफ शेख, धनराज चौधरी, गणेश ठोकळ, गोटीराम पवार, भानुदास मोरे, विजय सांगळे, दिनेश चौधरी, बाळशीराम ठोकळ, संपत व्यवहारे, आरिफ शेख, संभाजी नवले, महेश ठोकळ, अभिमन्यू चौधरी, दयाराम चौगुले, केशव वाव्हळ आणि फिरोज शेख आदी उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी बबन राठोड, संदीप चव्हाण, कृष्णा आव्हाड, प्रवीण परशुराम जाधव, प्रवीण कनीराम जाधव, रवी पवार, चिमाजी भले, राजू पथवे, संतोष गोयकर, तुषार चौगुले, अबू दरेकर, प्रवीण भनगडे, लहू भनगडे, वैभव खांडके आणि संदीप वाव्हळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

समाजातील गरजू, कष्टकरी आणि वंचित घटकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. सचिन नरवडे आणि इंजि. प्रवीण फलके यांनी ६०० कुटुंबांना दिवाळी किट देऊन केवळ वस्तूंचे वाटप केले नाही, तर त्यांच्या घरात आनंदाचा दिवा पेटविण्याचा प्रयत्न केला आहे. युवा फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत सामाजिक एकोपा आणि सेवाभावाचा आदर्श निर्माण केला. दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या कुटुंबांच्या दिवाळीत आनंदाचा प्रकाश पसरविणारा हा उपक्रम ढवळपुरी परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

**देविदास फलके**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.०६ नोव्हेंबर २०२६ । पान ८

## ताहाराबाद परिसरातून अल्पवयीन मुलीला अमिष दाखवून पळवले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील ताहाराबाद परिसरातून एक १७ वर्षे १० महिन्यांची अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना १ नोव्हेंबर २०२६ रोजी उघडकीस आली. अज्ञात व्यक्तीने आमिष दाखवून मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा संशय तिच्या वडिलांनी व्यक्त केला. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पिडीत मुलगी ताहाराबाद येथे तीच्या वडिलांसह राहते. १ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास मुलीचे वडिलांसह बाहेर गावे गेले होते. त्यावेळी त्यांची मुलगी घरीच होती. दरम्यान सकाळी साडेदहा वाजल्या पासून मुलगी घरी दिसत नसल्याची माहिती वडिलांना मिळाली. त्यानंतर वडील सायंकाळी घरी परतले. त्यांनी गावात तसेच नातेवाईकांकडे मुलीचा शोध घेतला. मात्र ती कोठेही आढळून आली नाही. अखेर अज्ञात व्यक्तीने काहीतरी आमिष दाखवून अज्ञात कारणासाठी मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करीत वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार अज्ञात आरोपी विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. बेपत्ता मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# ऊस दराबाबत कारखान्यांनी आठवडाभरात निर्णय घ्यावा : ना.विखे पाटील

## शेतकरी संघटना व कारखाना प्रतिनिधी समवेत प्रथमच बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांबाबत बैठक घेऊन येत्या ९ नोव्हेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार साखर कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी तातडीने करण्यात येणार असून, त्यासाठी तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करण्यात येईल. या तपासणीवेळी शेतकरी अथवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित राहतील. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामातील ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी



संघटनांच्या प्रतिनिधींकडून विविध समस्या व मागण्या जाणून घेतल्या. ऊस दर आणि शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत कारखाना व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घ्यावी.

जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी स्वतंत्र बैठक घेऊन या प्रश्नांवर चर्चा करावी आणि ९ नोव्हेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.राज्य सहकारी बँकेच्या धोरणाप्रमाणे जिल्हा सहकारी बँकेचे धोरण निश्चित होईल.सध्या जिल्हा बँकेवर प्रशासक असल्याने कारखान्यांना मदत करण्याबाबत त्यांच्याशी यासंदर्भात बोलणार असल्याचे मंत्र्यांनी सांगितले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून कारखान्यांतील वजनकाट्यांच्या अचूकतेबाबत उपस्थित करण्यात आलेली मागणी मान्य करण्यात आली आहे. त्यानुसार तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाचे अधिकारी यांच्या संयुक्त पथकामार्फत सर्व संबंधित कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी करण्यात येणार आहे. ही तपासणी पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी शेतकरी किंवा शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींही पथकासोबत उपस्थित राहतील. त्यामुळे वजन प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गळीत हंगामादरम्यान येणाऱ्या अडचणी आणि तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राधान्याने हाताळून त्यावर योग्य तोडगा काढण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यात समन्वय राखून प्रश्न सोडविण्याची भूमिका शासनाची आहे. शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांचा सकारात्मक विचार करून सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याने मार्ग काढण्यात येईल, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपमहापौर धनंजय जाधव, प्रादेशिक उपसंचालक(साखर) संजय गोंदे यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कारेगाव कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत अपात्रतेच्या भीतीने राजीनाम्यांचे सत्र सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील पात्रतेच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या घडामोडींना आता महत्त्वाचे वळण मिळाले आहे. संस्थेचे संचालक मच्छिंद्र रंगनाथ उंडे यांनी दिलेला राजीनामा पंचकमिटीच्या सभेत मंजूर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

संचालकांच्या पात्रतेबाबतची सुनावणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर यांच्याकडे सुरू होती. या प्रकरणात पाठपुरावा सुरू असताना एका संचालकाचा राजीनामा मंजूर झाल्याने संस्थेतील संचालकांच्या पात्रतेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

संस्थेच्या दि. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या पंचकमिटी सभेत राजीनाम्याबाबत चर्चा करण्यात आली. सभेतील ठरावानुसार संबंधित संचालकांचा राजीनामा मंजूर करण्यात आल्याचे कागदपत्रातून दिसून येते.

दरम्यान, नानासाहेब राजाराम गोरे आणि जालिंदर भाऊसाहेब होले या दोन संचालकांच्या पात्रतेबाबतचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. त्यांच्या सुनावणीचा निकाल काय लागतो, याकडे संस्थेच्या सभासदांचे लक्ष लागले आहे.

संस्थेतील पारदर्शकता, नियमांचे पालन आणि सभासदांच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या या पाठपुराव्यामुळे सहकारी क्षेत्रात चर्चेला सुरुवात झाली आहे. सत्याचा विजय होतो, नियमांचे पालन झाले पाहिजे आणि संस्थेचा कारभार पारदर्शक असला पाहिजे, अशी सभासदांची अपेक्षा आहे.

## डॉ. सुजय विखेंची जिल्हा बँकेच्या संचालकपदी निवड

### दादासाहेब गोंदकर यांच्याकडून सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल शिर्डी येथील नामांकित 'हॉटेल तानिया प्रेसिडंट'चे व्यवस्थापकीय संचालक व साई निर्माण उद्योग समूहाचे आधारस्तंभ दादासाहेब गोंदकर यांनी डॉ. विखे पाटील यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार केला. अहिल्यानगर जिल्ह्याच्या सहकार, सामाजिक आणि राजकीय वर्तुळात डॉ. सुजय विखे पाटील यांच्या या निवडीमुळे अत्यंत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकरी, छोटे व्यावसायिक, पतसंस्था आणि संपूर्ण सहकार क्षेत्राला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलताना साई निर्माण उद्योग समूहाचे आधारस्तंभ दादासाहेब गोंदकर म्हणाले की, डॉ. सुजय विखे पाटील यांचे नेतृत्व, अभ्यासूपणा आणि युवा कार्यशैली यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कामकाजाला नवी गती व दिशा



मिळेल. जिल्ह्यातील बळीराजा आणि सहकार क्षेत्रातील संस्थांच्या प्रगतीसाठी त्यांचा अनुभव अत्यंत मोलाचा ठरेल. त्यांची ही निवड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी श्री. दादासाहेब गोंदकर व साई निर्माण उद्योग समूहाचे आभार मानले आणि जिल्हा बँकेच्या माध्यमातून तळागाळातील घटकांपर्यंत बँकेच्या योजना पोहोचवून बँकेचा नावलौकिक अधिक उंचावण्याचा मानस व्यक्त केला.

## व्याजदरवाढीविरोधात सभासदांचे आंदोलन; सत्ताधारी गटाच्याच नेत्याचे नेतृत्व!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : तब्बल २५ वर्षे प्राध्यापक भाऊसाहेब कचरे यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या पुरोगामी मंडळाची सत्ता उलथवून दीड वर्षापूर्वी एकहाती सत्ता मिळविणाऱ्या परिवर्तन मंडळाला आता सभासदांच्या नाराजीला सामोरे जावे लागत आहे. व्याजदरवाढ आणि वर्गणीतील वाढीच्या निषेधार्थ दिवाळीच्या तोंडावर सभासदांनी आंदोलन केले. विशेष म्हणजे, हे आंदोलन सत्ताधारी परिवर्तन मंडळाचे नेते व मार्गदर्शक उद्धवराव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यामुळे या आंदोलनाची विशेष चर्चा रंगली आहे.

निवडणुकीपूर्वी सत्तेत आल्यास व्याजदर सात टक्क्यांपेक्षा कमी करू आणि लाभांश वाढवू, अशी आश्वासने परिवर्तन मंडळाने दिली होती. मात्र, प्रत्यक्षात सभासदांना पूर्वसूचना न देता व्याजदरात एक टक्का वाढ आणि सरसकट एक हजार रुपयांची वर्गणी वाढविण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

या निर्णयामुळे सभासदांवर दरमहा तीन ते चार हजार रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे सांगण्यात आले. सलग दोन सर्वसाधारण सभांनंतरही लाभांश कमी मिळाला. कृतज्ञता निधीच्या वसुलीत दुपटीपेक्षा अधिक वाढ करूनही प्रत्यक्ष लाभ देताना वाढ करण्यात आली नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली.

संस्थेच्या जुन्या इमारतीवरील तिसऱ्या मजल्याचे बांधकाम तसेच शाखांमधील रंगरंगोटी, फर्निचर व दुरुस्तीवर अनावश्यक खर्च होत असल्याचा आरोपही करण्यात आला. या खर्चामुळे सभासदांच्या लाभांशावर परिणाम होत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

व्याजदरवाढ आणि वर्गणीतील वाढ तातडीने मागे घ्यावी, अनावश्यक खर्चाला आळा घालावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनात प्रा. भाऊसाहेब कचरे, सूर्यकांत डावखर, उत्तमराव खुळे, दिलीपराव काटे, कैलास राहणे, वाल्मीक बोठे, उद्धवराव सोनवणे यांच्यासह पुरोगामी आणि परिवर्तन मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोधेगावमध्ये बिबट्याचा पुन्हा हल्ला !

### कुत्र्याला ठार केल्यानंतर महिलेवर प्राणघातक हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील गोधेगाव येथे गुरुवारी पहाटे ३.३० ते ४ वाजण्याच्या सुमारास बिबट्याने बांधलेल्या कुत्र्यावर हल्ला करून त्याला ठार केले. त्यानंतर पहाटे साडेचारच्या सुमारास कुसुम हिरामण पळारे या महिलेवर बिबट्याच्या मादीने हल्ला केला. जखमी महिलेला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, नेवासा फाटा येथे दाखल करण्यात आले आहे.

बिबट्याचा बंदोबस्त अद्याप झालेला नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. हल्लेखोर बिबट्याचा तातडीने शोध घ्यावा, परिसरात पिंजरा व आवश्यक गस्त



व्यवस्था करावी, नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

नागरिकांनी पहाटे व रात्री घराबाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी, लहान मुले व पाळीव प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे अशा सूचना सोशल मीडियाच्या माध्यमातून केल्या जात असून वनविभागाने आणखी एखादी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी अशी अपेक्षा या परिसरात राहणाऱ्या नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मागील आठवड्यात एक बिबट्या पिंजऱ्यात अडकला होता या परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला होता.

अंगण साफ करत असणाऱ्या महिलेवर बिबट मादीचा हल्ला झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून माहिती व तंत्रज्ञानाच्या या युगात बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने शोध मोहीम हाती घ्यावी ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करून बिबट्याला कैद करावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# कर्मवीर काळे यांचा १४ वा पुण्यस्मरण सोहळा

### कीर्तनातून समाजसेवेच्या कार्याचा गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : प्रतिकूल परिस्थितीवर मात करून समाजहितासाठी आयुष्य समर्पित करणारे कर्मवीर शंकररावजी काळे हे निःस्वार्थ समाजसेवेचे आदर्श होते. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी हजारो कुटुंबांचे संसार उभे केले. त्यांचे जीवन म्हणजे अखंड सेवेचा यज्ञ असल्याचे गौरवोद्गार प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांनी काढले.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे संस्थापक माजी खासदार कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या १४ व्या पुण्यस्मरणानिमित्त कर्मवीर शंकरराव काळे स्मृती उद्यानात आयोजित कीर्तनप्रसंगी ते बोलत



होते. मंडलिक महाराज म्हणाले की, खरे समाजसेवक संकटांचे गाऱ्हाणे गात बसत नाहीत, तर त्यातून मार्ग काढून समाजासाठी योगदान देतात. संत तुकाराम महाराजांच्या 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले' या अभंगातील मानवतेचा संदेश कर्मवीर काळे यांनी आपल्या कार्यातून प्रत्यक्षात उतरविला. समाजाची कामे ही स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी मानून त्यांनी लोककल्याणासाठी काम केले.

यावेळी माजी आमदार अशोकराव काळे, आमदार आशुतोष काळे, चैतालीताई काळे यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी, संचालक, विविध संस्थांचे प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते. आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी २१ ते २३ नोव्हेंबरदरम्यान गौतम पब्लिक स्कूलच्या मैदानावर आयोजित कर्मवीर कृषी महोत्सवाची माहिती देत शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच मतदारसंघातील सहा भजनी मंडळांना भजन साहित्याचे वाटप करण्यात आले.

# सुवर्णपदक विजेत्या शिवम पटारे, अजित पवार यांचा गौरव

## वर्ग एकचे अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगा; अपर पोलीस अधीक्षक वाघचौरे यांचे खेळाडूंना प्रोत्साहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : ग्रामीण मातीतून घडलेल्या दोन युवा कबड्डीपटूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदकाची कमाई करत श्रीरामपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. प्रतिकूल परिस्थिती, मर्यादित सुविधा आणि सरावातील अडचणींवर मात करून शिवम पटारे व अजित पवार यांनी मिळवलेले यश केवळ दोन खेळाडूंचे नसून संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या या कामगिरीतून ग्रामीण भागातील नव्या पिढीला खेळाची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करत भविष्यात या दोन्ही खेळाडूंनी वर्ग एकचे अधिकारी व्हावे, अशी अपेक्षा अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी व्यक्त केली.

कॉमनवेल्थ कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या शिवम पटारे व अजित पवार या खेळाडूंचा मराठी पत्रकार संघ, श्रीरामपूर यांच्या वतीने शासकीय विश्रामगृहात गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वाघचौरे बोलत होते.

खेळाकडे केवळ मनोरंजन किंवा वेळ घालवण्याचे साधन म्हणून न पाहता करिअरची मोठी संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. जिल्हास्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासनाच्या नोकऱ्यांमध्ये पाच टक्के आरक्षणाची तरतूद आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळविणाऱ्या खेळाडूंसाठी शासकीय सेवेतही संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत



खेळालाही प्राधान्य द्यावे. पालकांनीही खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा. ग्रामीण भागात खेळाडूंना आवश्यक सुविधा आणि प्रोत्साहन मिळाले, तर अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू घडू शकतात, असे वाघचौरे म्हणाले. मराठी पत्रकार संघाने खेळाडूंच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी आयोजित केलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

चंद्ररूप डाकले महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. सुभाष देशमुख यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे खेळाडू घडण्यातील आव्हानांकडे लक्ष वेधले. मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे मुलांच्या शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. शाळा-महाविद्यालयांमध्ये खेळाडू घडविण्यासाठी आवश्यक वातावरण, नियमित सराव आणि योग्य आहाराच्या सुविधा अपुऱ्या आहेत. अशा प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत शिवम पटारे आणि अजित पवार यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवून श्रीरामपूरचे नाव देश-विदेशात उज्ज्वल केले, ही अभिमानास्पद कामगिरी आहे, असे ते म्हणाले. यावेळी कॉमनवेल्थ आणि एशियन स्पर्धांमध्ये पॉवरलिफ्टिंगमध्ये सुवर्ण व कांस्यपदक मिळविल्याबद्दल प्रा. डॉ. देशमुख यांचाही गौरव करण्यात आला.

पत्रकार संघाचे अध्यक्ष करण नवले यांनी संघाच्या सामाजिक व क्रीडाविषयक उपक्रमांची माहिती दिली. कार्याध्यक्ष बाळासाहेब आगे, पंचायत समितीचे माजी उपसभापती बाळासाहेब तोरणे, बाजार समितीचे संचालक राधाकृष्ण आहेर, बोरावके महाविद्यालयाचे निवृत्त क्रीडा संचालक प्रा. एल. एन. शेख, प्रसन्न बिंगी यांनी मनोगत व्यक्त करून खेळाडूंचे अभिनंदन केले.

यावेळी पत्रकार संघाचे मार्गदर्शक ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी, रमण मुथा, पद्माकर शिंपी, नागेश सावंत, दत्तात्रेय मेटे, पांडुरंग पवार, अनिल पटारे, बाळासाहेब उंडे, दीपक निंबाळकर, दीपक कुऱ्हाडे, शरद अंबादास नवले, सुधाकर बोंबले, किशोर साळुंके, जयराज रणदिवे, सचिन उघडे, अर्जुन राऊत, हनिफ पठाण, गणेश गायधने, अजय कदम, संतोष सावंत, हेमंत गायधने, सोमनाथ देवकर, अमोल पंडित, सूरज सूर्यवंशी आदी उपस्थित होते. प्रारंभी प्रदीप आहेर यांनी स्वागत केले. सुरेश कांगुणे यांनी प्रास्ताविक केले. संतोष मते यांनी सूत्रसंचालन केले, तर ग्रामीण पत्रकार भाऊसाहेब काळे यांनी आभार मानले.